मंत्रालयात सुट्टीच्या दिवशी जीआरचा 'धडाका', अवघ्या ४८ तासांत २०७ शासन निर्णय

पान २ वर

RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे

मुंबईत उभ्या राहणाऱ्या राज्यातील सर्वात मोठ्या सहकार भवनाचे थाटात भूमिपूजन

पान ३ वर

वर्ष: ११ अंक :१८ ■ मुंबई, मंगळवार ३१ मार्च ते ६ एप्रिल २०२६

मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

## पावसाळापूर्व नालेसफाई
## गाळ काढण्याच्या कामात गंभीर अनियमिततेच्या तक्रारी

**मुंबई, प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या तयारीचा भाग म्हणून मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) मोठ्या आणि लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे वेगाने सुरू करण्याचे आदेश आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. २९ मार्चपासून या कामाला औपचारिक सुरुवात झाली असून, इतर नाल्यांमध्येही गाळ उपसण्याचे काम सुरू झाले आहे. गाळ काढल्यानंतर ४८ तासांत त्याची विल्हेवाट लावावी, कामाचे सुयोग्य नियोजन करावे अशा सूचना आयुक्तांनी शनिवारी यंत्रणेला दिल्या. पावसाळ्यात मुंबईत पाणी तुंबण्याची समस्या टाळण्यासाठी ही कामे महत्त्वाची मानली जातात.

परंतु, या कामांमध्ये गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी समोर येत आहेत. विशेषतः गोरेगाव (पी/साउथ वॉर्ड) परिसरातील नाल्यांमध्ये ठेकेदारांकडून गाळ पूर्णपणे काढला जात नसल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. प्रत्यक्षात नाल्यातून काढलेला गाळ एजन्सीला दिला जातो, मात्र ठेकेदार तो पूर्णपणे काढत नाहीत. उलट, नाल्याच्या काठावर ढिगारे रचले जातात किंवा कचरा मिसळून गाळाचे वजन वाढवले जाते. यामुळे बीएमसीला जास्त पैसे द्यावे लागतात, तर प्रत्यक्ष सफाई अपुरी राहते.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महानगरपालिका सहाय्यक आयुक्त (पी साउथ) यांनी या कामाची काटेकोर पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना पाठवावे. मात्र, अनेकदा हे अधिकारी ठेकेदारांशी हातमिळवणी करत असल्याचे दिसून येते. ठेकेदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कमिशन देतात, त्यामुळे काम योग्य पद्धतीने होत नाही. परिणामी, नालेसफाई अपुरी राहते आणि पावसाळ्यात पाणी तुंबण्याची शक्यता वाढते.

मागील काळात मिठी नदीच्या गाळ काढण्याच्या कामातही अशाच प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या घटना समोर आल्या होत्या. काही ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले, तर काही प्रकरणांमध्ये ईओडब्ल्यूने एफआयआर दाखल केले. तरीही गोरेगावसारख्या भागात ही समस्या कायम आहे. नागरिक मागणी करतात की, कामाच्या प्रगतीचे फोटो-व्हिडिओ पुरावे, स्वतंत्र ऑडिट आणि कठोर देखरेख व्हावी. गाळ विल्हेवाटीचे नियोजन पारदर्शक असावे.

बीएमसी आयुक्तांनी दिलेल्या सूचनांचे कठोर पालन झाले तरच मुंबई पावसाळ्यात जलमय होणार नाही. अन्यथा, अधिकारी-ठेकेदार यांच्या संगनमताने होणाऱ्या या प्रकारामुळे नागरिकांना दरवर्षी त्रास सह

# सर्व संबंधितांची नार्को टेस्ट करा
## खरात प्रकरणात माजी मंत्र्यांचे थेट राष्ट्रपतींना पत्र

**मुंबई, प्रतिनिधी**

**नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात सतत वेगवेगळी माहिती समोर येत आहे. आता या प्रकरणी नवी खळबळ उडाली आहे. माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना थेट पत्र लिहून, या प्रकरणातील सर्व संबंधित केंद्र आणि राज्यस्तरातील मंत्र्यांसह उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची नार्को टेस्ट करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे. सुबोध सावजी यांनी पत्र लिहून ही मागणी केली आहे.**

सुबोध सावजी यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, अशोक खरात प्रकरणामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मोठ्या प्रमाणात मलिन झाली आहे. सत्य समोर आणण्यासाठी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी आता कडक पावले उचलणे गरजेचे आहे. माजी मंत्र्यांनी पत्रात नमूद केले की, नार्को टेस्ट झाल्यास तपास प्रक्रियेला वेग मिळेल आणि प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होईल. यामुळे तपास यंत्रणेला महत्त्वाचे संकेत मिळतील,



असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुबोध सावजी यांनी आपल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, या प्रकरणात केंद्र आणि राज्य पातळीवरील संबंधित मंत्र्यांसह उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी व्हावी. दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी थेट हस्तक्षेप करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

माजी मंत्री सुबोध सावजी यांच्या या पत्राने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. अशोक खरात प्रकरण आता फक्त एका भोंदूबाबाच्या लैंगिक शोषणापुरते मर्यादित न राहता, उच्चपदस्थांच्या संभाव्य सहभागाच्या मुद्द्यापर्यंत पोहोचले आहे, असे दिसत आहे.

एसआयटी सध्या या प्रकरणात वेगाने तपास करत असून, खरातच्या मोबाइल डेटा, आर्थिक व्यवहार आणि संपर्कांच्या साखळीचा शोध घेत आहे. या पार्श्वभूमीवर सुबोध सावजी यांची ही मागणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात असून, राष्ट्रपतींकडून या पत्राला काय प्रतिसाद मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोदी सरकारची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे 'नक्षलमुक्त भारत'



**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

"जो शस्त्र उचलतील, त्यांना त्याची किंमत मोजावी लागेल," असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत 'नक्षलमुक्त भारत' विषयावरील चर्चेदरम्यान केले.

लोकसभेत सोमवारी 'नक्षलमुक्त भारत' या महत्त्वाच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली. केंद्र सरकारकडून नक्षलवादाविरुद्ध राबविण्यात आलेल्या यशस्वी मोहिमेचा संपूर्ण आराखडा मांडण्यात आला. ३१ मार्च २०२६ ही 'नक्षलमुक्त भारत' घडविण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, त्या पार्श्वभूमीवर अंतिम मुदतीच्या एक दिवस आधीच ही चर्चा घेण्यात आली.

यावेळी गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले की, काँग्रेसच्या कारकिर्दीत आदिवासी भागांचा अपेक्षित विकास झाला नाही. पूर्वी देशातील १२ राज्ये नक्षलवादाने प्रभावित होती; मात्र आता हा धोका जवळपास संपुष्टात आला आहे. नक्षलवाद वाढण्यास पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या धोरणांनाही त्यांनी जबाबदार धरले. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यानंतर गरिबांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या. यामुळे देशातील मागास भागांचा विकास वेगाने झाला. नक्षलवादामुळे या भागांच्या विकासात मोठे अडथळे येत होते, त्यामुळे त्याच्या उच्चाटनासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली, असे त्यांनी नमूद केले. या यशाचे श्रेय सीएपीएफ, कोब्रा, राज्य पोलीस, डीआरजीचे जवान तसेच स्थानिक आदिवासी नागरिकांना दिले. या मोहिमेत शहीद झालेल्या जवानांना त्यांनी विनम्र श्रद्धांजली अर्पण केली.

देश सर्वांत महत्त्वाचा असून, दीर्घकाळ नक्षलवादाच्या सावटाखाली देशातील काही भाग होते, असे शहा म्हणाले. बस्तर परिसरात विकास पोहोचत नव्हता; मात्र आता परिस्थिती बदलली असून तेथे विकासाला गती मिळाली आहे. बस्तरमधूनही नक्षलवाद जवळपास हद्दपार झाला असल्याचे त्यांनी सांगितले. "जो कोणी शस्त्र उचलेल, त्याला त्याची किंमत मोजावी लागेल," असा इशाराही त्यांनी दिला. आदिवासींच्या हक्कांसाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नक्षलवादाचा मूळ हेतू विकासाची मागणी नसून, डाव्या विचारसरणीच्या प्रसारामुळे तो वाढला, असे त्यांनी सांगितले. मोदी सरकारची १२ वर्षे देशासाठी लाभदायक ठरली असून 'नक्षलमुक्त भारत' ही संकल्पनाही त्याच काळात साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतातील नक्षलवाद आता शेवटच्या टप्प्यात असल्याचा दावा त्यांनी केला.डाव्या उग्र विचारसरणीचा विकासाशी काहीही संबंध नसून, "सत्ता ही बंदुकीच्या नळीमधूनच मिळते," हा त्यांचा मूलमंत्र असल्याचा आरोप त्यांनी केला. भोळ्या आदिवासींना भुलवून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी सांगितले. नक्षलवाद्यांनी आदिवासी भागांतील शाळा जाळल्या, विकास रोखला आणि रेड कॉरिडॉरमध्ये शासनाचा प्रभाव कमी केला, असे त्यांनी नमूद केले.

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनीही नक्षलवाद हा देशासमोरील काश्मीर आणि ईशान्य भारतापेक्षा मोठा धोका असल्याचे मान्य केले होते; मात्र काँग्रेस सरकारने ठोस उपाययोजना केल्या नाहीत, असा आरोप त्यांनी केला. १२ कोटी लोक दीर्घकाळ गरिबीत राहिले आणि या संघर्षात दोन्ही बाजूंतील सुमारे २० हजार युवक मृत्यूमुखी पडले, असेही त्यांनी सांगितले. मोदी सरकारची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे 'नक्षलमुक्त भारत' असल्याचा दावा करत, संशोधकही याची दखल घेतील, असे त्यांनी नमूद केले. १९७० पासून जे मूलभूत सुविधा त्या भागांना मिळाल्या नव्हत्या, त्या आता उपलब्ध झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले. नक्षलवादाला सत्तेचे अप्रत्यक्ष संरक्षण मिळाल्याशिवाय तो वाढू शकला नसता, असेही त्यांनी नमूद केले. अन्यायाविरोधात लढण्यासाठी संविधानाने मार्ग दिला असताना नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग स्वीकारला. त्यांनी निवडणुकांमध्ये अडथळे निर्माण केले आणि संविधानालाच लक्ष्य केले, असे त्यांनी सांगितले. सरकारची स्पष्ट भूमिका मांडताना अमित शहा म्हणाले की, "जो गोळीबार करेल, त्याला उत्तरही गोळीनेच दिले जाईल." मात्र, शस्त्र खाली ठेवणाऱ्यांशी सरकार संवाद साधण्यास तयार असून, त्यांना पुनर्वसनासाठी मदतही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## गोऱ्हे यांनी मंत्रिपदाच्या इच्छेखातर खरातची भेट घेतली- तृप्ती देसाई

**मुंबई, प्रतिनिधी**

राजकीय वर्तुळात सध्या एका खळबळजनक गौप्यस्फोटाने वादळ उठवले असून, एका बड्या महिला नेत्याचे नाव थेट भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाशी जोडले गेल्याने खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी नुकताच असा एक खळबळजनक दावा केला आहे, ज्यामुळे केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक स्तरावरही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या दाव्यानुसार, चक्क विधानसभेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी मंत्रिपदाच्या इच्छेखातर खरातची भेट घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. नाशिकच्या एका आलिशान हॉटेलमधील 'ती' भेट आणि कॉलेज रोडवरील खरातच्या कार्यालयातील वावर, याभोवती आता संशयाची सुई फिरू लागली आहे.

तृप्ती देसाईंच्या दाव्यानुसार, कोरोना काळापूर्वी नाशिकच्या पाथर्डी फाट्यावरील 'एक्स्प्रेस इन' हॉटेलमध्ये ही गूढ भेट पार पडली होती. नीलम गोऱ्हे तिथे मुक्कामाला असताना अशोक खरात त्यांना भविष्य सांगण्याच्या बहाण्याने भेटायला गेल्याचे सांगितले जाते. मात्र, हे केवळ भविष्य पाहण्यापुरते मर्यादित होते की त्यामागे मंत्रिपदाची मोठी राजकीय महत्त्वाकांक्षा दडली होती, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. इतकेच नव्हे तर, ज्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप आहेत, त्याच कॉलेज रोडवरील खरातच्या कार्यालयातही या महिला नेत्याची उपस्थिती होती, असा थेट आरोप केल्याने प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.

सर्वात मोठा प्रश्न उपस्थित केला जात आहे तो म्हणजे नीलम गोऱ्हे यांच्या मौनाचा. एरव्ही महिलांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका



घेणाऱ्या आणि तत्काळ परिपत्रके काढणाऱ्या गोऱ्हे या प्रकरणात इतक्या शांत का? १५० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर येऊनही आणि मुख्यमंत्री स्तरावर दखल घेतली जाऊनही त्यांनी अवाक्षरही न काढण्यामागे नेमके काय गुपित दडले आहे, याची चर्चा आता रंगू लागली आहे. ज्यांनी महिला अत्याचारांविरुद्ध लढण्यासाठी आपली राजकीय कारकीर्द घडवली, त्या नेत्याचं नाव अशा प्रकरणात येणं हे अनेकांच्या पचनी पडत नाहीये.

तृप्ती देसाई यांनी केवळ आरोप करून न थांबता, या भेटींच्या वेळी उपस्थित असलेल्या व्यक्तींनीच आपल्याला ही माहिती दिल्याचा दावा केला आहे. खरात आणि गोऱ्हे यांच्यात केवळ भविष्याची चर्चा झाली की काही आर्थिक देवाणघेवाण, याचा छडा लावण्यासाठी आता एसआयटीकडे सीडीआर तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या खोलात गेल्यास आणखी कोणते 'व्हाईट कॉलर' चेहरे समोर येणार आणि सत्तेच्या वलयात वावरणाऱ्या या बाबाचे जाळे नेमके कुठपर्यंत पसरले आहे, याचे कुतूहल आता संपूर्ण महाराष्ट्राला लागले आहे. या राजकीय भूकंपाचे पडसाद आगामी काळात कसे उमटतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## निरोपाच्या भाषणाने अनेकांना पोटदुखी त्यातूनच माझ्यावर आरोप- नीलम गोऱ्हे

**पुणे, प्रतिनिधी**

गेल्या चार दशकापासून आपण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करत असून राजकीय पद किंवा मंत्रिपदासाठी कोणत्याही भोंदूबाबाला आपण भेटायला गेलो नाही अशी प्रतिक्रिया नीलम गोऱ्हे यांनी दिली. आपल्यावर झालेल्या संस्कारामुळे हयात असलेल्या कोणत्याही बाबाच्या दर्शनासाठी आपण जात नाही, त्यामुळे अशोक खरातला कधीही भेटायचा संबंध नाही असं गोऱ्हे म्हणाल्या. भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर अशोक खरातची भेट घेतल्याचा आरोप केले होते. त्यावर गोऱ्हे यांनी प्रतिक्रिया दिली.

एक महिला आमदार मंत्रिपदासाठी अशोक खरातच्या कार्यलयात जात होत्या. नीलम गोऱ्हे या गेली पाच ते सहा वर्षे खरातकडे जात होत्या असा आरोप भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी केला होता. त्यावर नीलम गोऱ्हे यांनी त्यांची बाजू मांडली. अधिवेशनाच्या शेवटच्या भाषणात मी ज्यांच्यावर टीका केली ते दुखावले असतील, त्यामुळेच हे आरोप होत असल्याचं सांगत नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला.

तृप्ती देसाई यांनी केलेल्या आरोपांवर बोलताना नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, "गेल्या चार दशकांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करत असून आपल्या कुटुंबीयांनी जे आपल्यावर संस्कार केलेत त्यानुसार काम केलं. गेल्या पाच दशकांमध्ये कोणत्याही भोंदूबाबाच्या दर्शनाला गेले नाही. महिलांची प्रगती आणि सामाजिक न्याय यावर काम केलं. या काळात राजकीय पद किंवा मंत्रिपद मिळवण्यासाठी मी कधीही भोंदूबाबाच्या दर्शनाला गेले नाही. त्यामुळे नाशिक येथील एका हॉटेलमध्ये खरात नावाच्या व्यक्तीला भेटले ही बातमी स्पष्टपणे नाकारते."

अधिवेशनाच्या काळात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपलं कौतुक केल्याने काहीजणांना ते आवडलं नाही. तसेच आपण केलेल्या टीकेमुळे काहीजण दुखावले. त्यामुळेच आपल्यावर आता आरोप केला जात आहे असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

सगळीकडे सीसीटीव्ही असतात, अनेक ठिकाणी आपल्यासोबत फोटो काढतात. त्यावेळी जर कुणी गर्दीतून भेटलं असेल तर त्याची माहिती नाही, असंही नीलम गोऱ्हे म्हणाल्या. मी कधीच कुठल्या हयात असलेल्या महाराजाकडे गेले नाही, त्यामुळे अशी घटना घडली असेल त्याची शक्यता नाही, असंही त्या म्हणाल्या. या प्रकरणात सरकारने एसआयटी तपास सुरू केला आहे. त्यामुळे या बाबतीत मी काही बोलणे योग्य वाटलं नाही.

## प्रशासकीय अधिकारी बाहेर बसायचे, त्यांच्या पत्नी खरातच्या केबिनमध्ये जायच्या
### वडेट्टीवारांचा दावा

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील अत्यंत भयानक प्रकरण समोर आलं आहे. या प्रकरणामुळे अनेक नेत्यांची नावे समोर येत असून वरिष्ठ अधिकारीही अशोक खरातच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. दरम्यान, आता, काँग्रेसचे नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी गंभीर आरोप केला आहे. अनेक अधिकाऱ्यांच्या बायका खरातच्या ऑफिसमध्ये जायच्या असं ते म्हणालेत. .

विजय वडेट्टीवार म्हणाले, मंत्री, आमदार, शासकीय अधिकारी, आएएस, आयपीएस या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. चाकणकरांबरोबर यांचीही चौकशी झाली पाहिजे. मी सातत्याने म्हणतोय की अनेकांच्या, मोठमोठ्या लोकांच्या बायका या खरातच्या ऑफिसमध्ये जात होत्या. प्रशासकीय अधिकारी बाहेर बसत अन् यांच्या बायका खरातच्या ऑफिसमध्ये जात असत."

"अंधश्रद्धेला, भोंदूगिरीला तुम्ही समर्थन केलं आहे. आत काय झालं हे मी आता सांगणार नाही, कारण याबाबत माझ्याकडे पुरावे नाहीत. पण जे व्हिडिओ पुढे येत आहेत, ते सिलेक्टेड येत आहेत. १००० च्या वर पुढे व्हिडिओ आहेत. पण १५० च व्हिडिओ समोर आले. ज्या महिला यात दिसत आहेत, त्यांच्या पतींवर कारवाई झाली पाहिजे. आपल्या कुटुंबाला घेऊन ते तिथे गेले, मग तेही दोषी आहेत", असं म्हणत पीडित महिलांच्या पतींवर कारवाईची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले, "नवीन प्रकरण आमच्यापुढे आले आहेत. हा खरात अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक-दुसऱ्यांच्या फॅमिली शेअर करायचा. किती खालचं आणि घाणेरडा प्रकार होता. महाराष्ट्राच्या अस्मितेला संपवणं, महाराष्ट्राची इभ्रत काढण्याचं हे प्रकरण आहे. तरीही राज्यकर्त्यांना थोडीही लाज वाटत नाही, यापेक्षा दुर्दैवं काय? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## युद्धात मध्यस्थीसाठी भारत सहभागी होऊ शकतो; इराणने दाखवला विश्वास

**तेहरान, वृत्तसंस्था**

इराण युद्धात पाकिस्तान स्वतःला मध्यस्थ देश म्हणून पुढे आणण्याचा प्रयत्न करतोय परंतु त्यात त्याला फारसं यश मिळताना दिसत नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून इराणला पाठवलेले अमेरिकेच्या १५ अटींचा शांतता प्रस्ताव इराणने फेटाळून लावला. त्यानंतर पाकिस्तान निवडक इस्लामी राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक घेऊन पुन्हा मध्यस्थीचा प्रयत्न करू लागला. परंतु आता इराणच्या सरकारी सूत्रांच्या हवाल्याने वेगळी माहिती समोर आली आहे. इराणला भारताला मित्र राष्ट्र सांगत अमेरिकेसोबत चर्चेसाठी भरवसा असणारा देश म्हणून भारताचा उल्लेख केला आहे. पाकिस्तानच्या भूमिकेमुळे इराणच्या सरकारी सूत्रांनी प्रश्न उभे केलेत. रिपोर्टनुसार, भारत हा इराणचा मित्र आहे. त्यामुळे भारत चर्चेत सहभागी होऊ शकतो. अमेरिकेसोबत मध्यस्थी करताना पाकिस्तानच्या भूमिकेवर इराणने शंका व्यक्त केली. पाकिस्तान कुठल्याही निकालाचे श्रेय घेऊ इच्छितो. आम्ही वाटाघाटी सुरू केल्याचे सर्व दावे फेटाळून लावतो किंवा अमेरिकेच्या राष्ट्रपतींनी केलेले दावे ज्यात आम्ही त्यांच्या १५-कलमी शांतता प्रस्तावाला सहमत आहोत हेही नाकारतो.

## रुपयात 'ऐतिहासिक' घसरण!
### प्रथमच ९५ च्या पुढे

**मुंबई, प्रतिनिधी**

डॉलरच्या तुलनेत रुपया प्रथमच ९५ च्या पातळीच्या पुढे गेला असून नव्या आयुष्यकालीन नीचांकी पातळीचा विक्रम नोंदवला आहे. विशेष म्हणजे, दिवसातील उच्चांकापासून रुपयात २.३३ रुपयांची मोठी घसरण झाली आहे. आकडेवारीनुसार, येत्या काही दिवसांत रुपयात आणखी घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सकाळच्या सत्रात रुपयात १२८ पैशांची लक्षणीय वाढ दिसून आली होती. त्यामुळे रुपया पुन्हा कोसळेल, अशी कुणालाही अपेक्षा नव्हती. मात्र, दुपारपर्यंत चलन बाजाराने अचानक कलाटणी घेतली आणि सर्वांनाच धक्का बसला. डॉलरच्या तुलनेत रुपया केवळ ९५ च्या पुढेच गेला नाही, तर नव्या आयुष्यकालीन नीचांकी पातळीवर पोहोचला.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा पुण्याच्या भवानी पेठेतील मुक्काम बदलणार

**पुणे, प्रतिनिधी**

पुण्याच्या भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरातील मुक्कामाची अपुरी जागा, संतांच्या दर्शनासाठी होणारी पुणेकरांची गर्दी या सर्व गोष्टींचा विचार करून यंदा भवानी पेठेतील मुक्कामाची जागा बदलण्याचा निर्णय दिंडी समाजाच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान पुण्यातील दोन दिवसांचा मुक्काम रद्द करून एक मुक्काम वडकी नाला येथे घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंडी समाजाची बैठक सोहळ्याचे मालक ऋषिकेश आरफळकर पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पुणे, लोणंद, नातेपुते, माळशिरस व वेळापूर येथील पालखी सोहळ्याच्या मुक्कामाच्या जागेबाबत संस्थान व दिंडी समाजाने अडचणी मांडल्या.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे म्हणाले, गतवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पुण्यात भवानी पेठेत पोहोचल्यानंतर एकच गर्दी उसळली. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवर दर्शनासाठी येणार होते. गर्दीमुळे दिंड्या पालखी जवळ पोहोचू शकल्या नाहीत. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनीही पालखी सोहळ्याचे चित्रीकरण करण्यासाठी गर्दी केली होती. पालखी विठोबा मंदिरातील विश्वस्थांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने एकच गोंधळ उडाला व जागतिक कीर्तीच्या देदीप्यमान सोहळ्याची बदनामी झाली. देवस्थानाला अपमानास्पद वागणूक मिळाली. अशा घटना वारंवार घडू नये यासाठी सोहळ्याच्या परंपरेला बाधा न येता प्रशासनाबरोबर चर्चा करून भवानी पेठेतील मुक्कामाची जागा बदलावी. तसेच एस.पी. कॉलेज, टिळक रोड किंवा नेहरू स्टेडियम येथे पालखी मुक्कामासाठी जागा पाहावी, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## पार्थ पवार अचानक 'शिवतीर्थ'वर
### राज ठाकरेंच्या भेटीने राजकीय चर्चांना उधाण

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात आज एका अशा भेटीने सर्वांच्या नजरा वळवल्या आहेत, ज्याची कोणी कल्पनाही केली नव्हती. राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ पवार आज दुपारी अचानक मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी पोहोचले. अजित पवार यांच्या निधनानंतर बदललेल्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच रोहित पवार यांनीही राज ठाकरेंची भेट घेतली होती, त्यामुळे पवार घराण्यातील युवा नेत्यांचा शिवतीर्थावरील वावर राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाताच्या चौकशीच्या अनुषंगाने यापूर्वीच्या भेटी झाल्या होत्या, मात्र



आज पार्थ पवार यांनी घेतलेली भेट ही केवळ चौकशी संदर्भात आहे की त्यामागे काही वेगळे राजकीय गणित दडले आहे, याबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे. राज ठाकरे यांच्याशी चर्चा केल्यानंतर पार्थ पवार यांनी माध्यमांशी संवाद साधण्याचे टाळले आणि ते थेट आपल्या गाडीत बसून निघून गेले. त्यांच्या या मौनामुळे या भेटीचे गूढ अधिकच वाढले असून राजकीय तर्कवितर्कांना ऊत आला आहे. दुसरीकडे, पार्थ पवार सध्या राज्यसभेत खासदार आहेत. सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेचा राजीनामा देऊन राज्याच्या दुसऱ्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर आता पार्थ पवार यांची वर्णी लागली आहे. सुनेत्रा पवार यांच्याकडे सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सर्व सूत्रे असून, त्या पक्षाच्या अध्यक्षपदी आणि विधिमंडळात प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत पार्थ पवारांची ही 'राज' भेट भविष्यातील नवीन युतीचे संकेत तर नाहीत ना, असा प्रश्न विचारला जात आहे.

या भेटीचे पडसाद आगामी काळात राज्याच्या राजकारणात कसे उमटतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सत्तेच्या पटलावरील हा नवीन डाव नेमकी कोणती दिशा घेतो, याकडे आता सर्व राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

## खासदारांच्या कारचा थरारक अपघात

**नागपूर, प्रतिनिधी**

भंडारा-गोंदियाचे काँग्रेस खासदार डॉ. प्रशांत पडोले यांच्या कारला नागपूरच्या वेशीवर भीषण अपघात झाला असून, या घटनेने राजकीय वर्तुळात अनेक शंकाकुशंकांना उधाण आले आहे. धडक इतकी जोरदार होती की कारचा दर्शनी भाग चक्काचूर झाला, मात्र तांत्रिक बिघाडामुळे कारची एकही एअरबॅग उघडली नाही. या धक्कादायक प्रकारामुळे खासदारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, यामागे काही घातपाताचा कट तर नाही ना, अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

संसदेच्या अधिवेशनात सहभागी होण्यासाठी डॉ. पडोले सोमवारी सकाळी भंडाऱ्याहून नागपूर विमानतळाकडे निघाले होते. वाटेत एका भरधाव ट्रकने त्यांच्या खासगी कारला जोरदार धडक दिली.



नशीब बलवत्तर म्हणून खासदार आणि त्यांचा चालक या भीषण अपघातातून थोडक्यात बचावले. विशेष म्हणजे, गेल्या वर्षभरात डॉ. पडोले यांच्यासोबत याच मार्गावर घडलेला हा तिसरा अपघात आहे. वारंवार होणाऱ्या या घटनांमुळे समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, सखोल चौकशीची मागणी केली जात आहे.

या घटनेनंतर डॉ. पडोले यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सोशल मीडियावर टॅग करत, "खासदारच सुरक्षित नसतील, तर सर्वसामान्यांचे काय होणार?" असा परखड सवाल केला. इतक्या महागाड्या कारची एअरबॅग न उघडणे हा तांत्रिक दोष आहे की घातपात, याचे उत्तर आता तपास यंत्रणांना द्यावे लागणार आहे.

अपघाताच्या भीषणतेनंतरही डॉ. पडोले यांनी दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी ठरली. कारचे नुकसान झाले आणि किरकोळ दुखापत झाली असतानाही त्यांनी वेळ न घालवता एका दुचाकीस्वाराची लिफ्ट घेतली आणि नागपूर विमानतळ गाठले. तिथे प्राथमिक उपचार घेऊन ते तातडीने दिल्लीकडे रवाना झाले. युक्रेनमधून वैद्यकीय शिक्षण घेतलेले डॉ. पडोले स्वतः एक प्रथितयश डॉक्टर आहेत, तरीही या अपघाताने त्यांच्या सुरक्षेबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

## ठाकरे गटाचे खासदार फुटणार?
### संजय राऊतांचे 'ऑपरेशन टायगर'ला चोख प्रत्युत्तर

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या फोडाफोडीच्या राजकारणाने पुन्हा एकदा जोर धरला असून, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार शिंदे गटात सामील होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. शिंदे गटाकडून 'ऑपरेशन टायगर' राबवण्याचे संकेत दिले जात असतानाच, खासदार संजय राऊत यांनी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधताना सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. "आमचे ९ खासदार शेवटपर्यंत आमच्यासोबतच ठाम राहतील," असा ठाम विश्वास व्यक्त करत राऊतांनी सत्ताधाऱ्यांवर खोचक टीका केली आहे.

संजय राऊत यांनी यावेळी भाजप आणि शिवसेनेच्या संघर्षाची तुलना अमेरिका आणि इराणच्या युद्धाशी केली. "भाजपने आमच्यावर हा संघर्ष लादला आहे. ज्याप्रमाणे अमेरिका इराणवर युद्ध लादते आणि इराण धैर्याने लढतो, तशीच आमची भूमिका आहे. शेवटी अमेरिकेला जशी माघार घ्यावी लागते, तशीच वेळ येथील सत्ताधाऱ्यांवर येईल," असा इशारा त्यांनी दिला. तसेच, "दुसऱ्यांचे खासदार फोडण्यापेक्षा आपल्या खुर्चीखाली भाजपने जे सुरुंग लावले आहेत, त्यावर शिंदे गटाने चिंतन करावे," असा टोलाही त्यांनी लगावला.

राजकारणातील 'संपर्का'बाबत बोलताना राऊत यांनी एक मोठे विधान केले आहे. "राजकारणात प्रत्येक जण एकमेकांच्या संपर्कात असतो, विशेषतः शत्रू हा जास्त संपर्कात असतो," असे सांगत त्यांनी खळबळ उडवून दिली. "राजकीय वैर आणि वैयक्तिक संबंध या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आम्ही एकमेकांच्या कौटुंबिक कार्यक्रमांना उपस्थित राहतो, पण त्यावरून आमचा वैचारिक संघर्ष थांबला आहे, असे समजू नये," असे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेना ही फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा एकदा आकाशात झेप घेताना दिसेल, असा आत्मविश्वास व्यक्त करत राऊत यांनी खासदारांच्या फुटीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. मात्र, "शत्रू जास्त संपर्कात असतो" या त्यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात आता पडद्यामागे नेमक्या काय हालचाली सुरू आहेत, यावरून तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## पुण्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस; काही ठिकाणी गारपीट

**पुणे, प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये आज अचानक हवामान बदलण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दुपारी २:५० वाजता देण्यात आलेल्या माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या इशाऱ्यानुसार पुणे, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर आणि सांगली या पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. सध्या पुण्यात पाऊस सुरु आहे.

त्याचप्रमाणे मराठवाड्यातील बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर आणि नांदेड येथेही विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांतही हवामान बिघडण्याची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होऊ शकते.

या बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांसाठी विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सध्या रब्बी हंगामातील पिके शेवटच्या टप्प्यात असून, गारपीट आणि जोरदार पावसामुळे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच विजांच्या कडकडाटामुळे शेतात काम करणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

# मंत्रालयात सुट्टीच्या दिवशी जीआरचा 'धडाका', अवघ्या ४८ तासांत २०७ शासन निर्णय

**मुंबई, प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या समाप्तीला अवघ्या काही तासांचा अवधी शिल्लक असताना, मंत्रालयातील प्रशासकीय यंत्रणेने सुट्टीच्या दिवशीही अहोरात्र काम करत शासन निर्णयांचा (GR) जणू पाऊस पाडला आहे. शनिवार आणि रविवार अशा दोन दिवसांच्या सुट्टीच्या काळात तब्बल २०७ जीआर प्रसिद्ध करण्यात आल्याने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. ३१ मार्चच्या डेडलाईनपूर्वी निधी खर्च करण्यासाठी सरकारची ही धावपळ आहे की यामागे काही विशेष राजकीय समीकरणे आहेत, अशी चर्चा आता रंगू लागली आहे.



साधारणपणे सुट्टीच्या दिवशी मंत्रालयाचे कामकाज बंद असते, परंतु ३१ मार्चच्या पार्श्वभूमीवर यंदाचे चित्र पूर्णपणे वेगळे पाहायला मिळाले. शनिवारी आणि रविवारी विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात उपस्थित होते. या दोन दिवसांत ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, नगरविकास आणि कृषी विभागाशी संबंधित सर्वाधिक निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, अनेक प्रलंबित विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे आणि त्यासाठीचा निधी वितरीत करणे यासाठी या सुट्टीच्या दिवसांचा पुरेपूर वापर करण्यात आला.

प्रशासकीय सूत्रांच्या माहितीनुसार, जर ३१ मार्चपर्यंत मंजूर झालेला निधी खर्च झाला नाही किंवा त्याबाबतचा शासन निर्णय निघाला नाही, तर तो निधी तांत्रिकदृष्ट्या 'लॅप्स' होतो म्हणजेच सरकारला परत जातो. हा निधी वाचवण्यासाठी आणि विकासकामांची गती कायम राखण्यासाठी सरकारने ही 'इमरजन्सी' पावले उचलली आहेत. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा नियोजन समितीचा निधी, विविध महामंडळांना दिलेले अनुदान आणि रस्ते विकासाच्या कामांचा समावेश आहे.

अवघ्या ४८ तासांत २०७ जीआर निघाल्यामुळे विरोधकांनीही आता सरकारवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. घाईघाईत काढलेल्या या निर्णयांमुळे कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाही का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मात्र, ३१ मार्चच्या या 'डेडलाईन' प्रेशरमुळे मंत्रालयातील संगणक आणि प्रिंटर रात्रभर सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले. आता या २०७ निर्णयांमुळे राज्याच्या तिजोरीवर नेमका किती भार पडणार आणि कोणत्या विभागाला सर्वाधिक लॉटरी लागली, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी

**मुंबई, प्रतिनिधी**

केंद्र शासन पुरस्कृत, 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाची 2022 ते 27 या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असाक्षरांना साक्षर करण्यासाठी अंमलबजावणी केली जात आहे. या कार्यक्रमांतर्गत सन 2025-26 मध्ये उल्लास ॲपवर नोंदणी झालेल्या असाक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा रविवार दि. 29 मार्च 2026 रोजी राज्यात घेण्यात आली.

मराठी, हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, गुजराती, कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली या नऊ माध्यमातून घेण्यात आलेल्या या परीक्षेतून निकषानुसार परीक्षार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून नवसाक्षरांना प्रमाणपत्र व गुणपत्रक एकत्रित देण्यात येणार आहेत. या चाचणीच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण ही जीवन कौशल्ये विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच त्या अनुषंगाने त्यांचे पुढील जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

मागील वर्षी 21 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या परीक्षेत सुमारे पाच लाख असाक्षरांनी सदर परीक्षा दिली होती. तर केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यात नव्याने नोंदणी केलेल्या सुमारे 1.23 लाख इतक्या असाक्षर व्यक्तींपैकी सुमारे एक लाख असाक्षर व्यक्तींनी चाचणी परीक्षा दिली.

या परीक्षेच्या निमित्ताने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त यांनी असाक्षरांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. 'जिल्हा परीक्षा निरीक्षक' म्हणून सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्यस्तरावरील सर्व शिक्षण संचालक, सहसंचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांनी भेट देऊन परीक्षांचे निरीक्षण केले तसेच परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांना आणि परीक्षार्थींना प्रोत्साहन दिले. यानिमित्ताने असाक्षरांना प्रोत्साहन देणाऱ्या सर्व यंत्रणांचे शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# १८ हजार ग्रामपंचायतींमध्ये विशेष महिला ग्रामसभा

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यभरात ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधत १८ हजार ग्रामपंचायतींमध्ये विशेष महिला ग्रामसभा आयोजित करण्यात आल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी रविवारी एक्सवरून दिली. या ग्रामसभेत बालविवाह प्रतिबंधक जनजागृती करण्यासोबतच विधवा प्रथा बंदी संदर्भात अनेक निर्णयांना एकमताने मंजुरी देण्यात आल्याची माहिती तटकरे यांनी दिली.

राज्यातील कोकण, नाशिक, पुणे, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या सहा प्रशासकीय विभागांमधील १८ हजार ७१० ग्रामपंचायतींनी विशेष महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. ग्रामपंचायतीमध्ये बालविवाह प्रतिबंधक जनजागृती करणे, विधवा प्रथा बंदी व विधवांच्या सन्मानाला प्रोत्साहन देणे, हुंडाप्रथेला आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे, महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देणे असे महत्त्वाचे ठराव अनेक गावांमध्ये एकमताने मंजूर करण्यात आले. महाराष्ट्रातील १८ हजार ७१० गावांमध्ये झालेला सक्षमीकरणाचा हा जागर महिला व बालविकास विभागाच्या प्रयत्नांना बळ देणारा ठरेल, असा विश्वासही मंत्री तटकरे यांनी यानिमित्ताने व्यक्त केला.

# प्रकल्पग्रस्तांचे दावे निकाली काढण्यासाठी ५७ लवाद

**मुंबई, प्रतिनिधी**



राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या अनेक प्रकल्पांमुळे भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा वेगवान निपटारा करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यात ५७ नवीन लवादांची नियुक्ती केली असून, यामुळे अनेक वर्षांपासून मोबदल्याविना रखडलेले २८ हजारांहून अधिक प्रकल्पग्रस्तांचे दावे आता जलदगतीने निकाली निघणार आहेत.

राज्यात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) अनेक प्रकल्प सुरू आहेत. मात्र, भूसंपादनाच्या वाढीव मोबदल्याबाबतची सुमारे २८ हजारांहून अधिक प्रकरणे लवादांकडे प्रलंबित आहेत. यातील काही प्रकरणे तर तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे प्रकल्पग्रस्तांचे हक्क, मोबदल्याची पद्धत व याविषयातील पारदर्शकता ही बाब लक्षात घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी स्वतंत्र लवादांची मागणी केली होती. त्यानुसार आता महाराष्ट्रातील अतिरिक्त आयुक्त आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील ५७अनुभवी अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नव्याने नियुक्त करण्यात आलेले हे ५७लवाद कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या सर्व विभागांतील जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहतील. यासंदर्भात महसूल विभागाने जारी केलेल्या पत्रात जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ एनए-चएआयचे प्रकल्प संचालक आणि भूसंपादन अधिकारी यांची बैठक घेऊन प्रलंबित प्रकरणांची या लवादांकडे विभागणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामात सुसूत्रता राहावी यासाठी एकाच निवाड्याशी संबंधित सर्व दावे एकाच अधिकाऱ्याकडे सोपवण्यात येणार आहेत. या लवादांच्या कामकाजाचा दरमहा आढावा घेण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे.

# जमाबंदी आयुक्त विभागाची डिजिटल क्रांतीकडे झेप

## १५० दिवसांच्या कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख संचालनालयाने (डीएलआर) डिजिटल युगाशी सुसंगत अशी व्यापक आणि प्रभावी कामगिरी नोंदवली आहे. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन यावर भर देत विभागाने राज्यातील जमीन नोंद प्रणाली अधिक सुलभ, वेगवान आणि विश्वासार्ह केली आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच सर्वोत्तम आयुक्त / संचालक गटातील ६८ सहभागींपैकी दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करून जमाबंदी आयुक्त कार्यालयाला गौरविण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तत्कालीन जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांच्या कार्यकाळात ही उल्लेखनीय कामगिरी झाली आहे.



**'महाभूमी'च्या माध्यमातून १०० टक्के ऑनलाइन सेवा**

राज्यातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मपैकी 'महाभूमी' पोर्टल हे एक असून, सात बारा उतारा, ८अ उतारा, प्रॉपर्टी कार्ड, फेरफार नोंदी यांसारख्या सेवा आता १०० टक्के ऑनलाइन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सेवांना १.८ अब्जांहून अधिक हिट्स मिळाल्यामुळे नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद आणि विश्वास स्पष्ट झाला आहे.

**फाईलचा निपटारा तीन दिवसात**

ई-ऑफिस प्रणालीची राज्यभर मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यात येत असून ४३० हून अधिक कार्यालयांमध्ये ८२ टक्के अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. फाईल निपटारा दर ९३ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून सरासरी तीन दिवसांत कामे पूर्ण होत आहेत. यामुळे प्रशासनातील कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे.

**डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर**

नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्यासाठी प्रभावी 'ग्रिव्हन्स रिड्रेसल' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. एसएमएसद्वारे अभिप्राय, दोन स्तरांवरील अपिल यंत्रणा आणि कालबद्ध सेवा वितरणामुळे उत्तरदायित्व अधिक मजबूत झाले आहे. तसेच ४,५०० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन डिजिटल प्रणालींचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यात आला आहे.

**सर्व जमीन संबंधित सेवा एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न**

नवोन्मेषाच्या दृष्टीने विभागाने 'भूमित्र' चॅटबॉट, व्हॉट्सॲपद्वारे सेवा, तसेच जीआयएस आधारित ई-मोजणी २.० सारख्या अत्याधुनिक प्रणाली विकसित केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने मोजणी प्रक्रिया जलद आणि अचूक करण्यात आली असून, ६३५ प्रकरणे एआयद्वारे सोडवण्यात आली आहेत. तसेच 'लँड डॅशबोर्ड'च्या माध्यमातून राज्य, विभाग, जिल्हा ते गाव पातळीपर्यंतच्या माहितीचे विश्लेषण, डेटा व्हिज्युअलायझेशन आणि निर्णय प्रक्रियेसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून एकसंध 'युनिफाइड लँड मॅनेजमेंट सिस्टीम' (युएलएमएस) विकसित करण्याचेही काम सुरू असून, सर्व जमीन संबंधित सेवा एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न आहे.

एकूणच, जमाबंदी आयुक्त कार्यालयाने १५० दिवसांच्या कार्यक्रमात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासनाचे आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

# भारताची सभ्यता: अवकाश आणि काळाच्या पलीकडील प्रवास या विषयावर मॅक्ससिटी लिटरेचर फेस्टिवलमध्ये विचारमंथन

**मुंबई, प्रतिनिधी**

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी येथे "भारताची सभ्यता: अवकाश आणि काळाच्या पलीकडील प्रवास" या विषयावर सखोल आणि विचारप्रवर्तक चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात भारतीय सभ्यतेची अखंडता, तिची तात्त्विक पायाभूत रचना, तसेच आधुनिक काळातील तिचे महत्त्व यावर विविध अंगांनी चर्चा करण्यात आली.

या पॅनेलमध्ये माहिती व जनसंपर्क विभागाचे सचिव ब्रिजेश सिंह, लेखक व कथाकार राजेश एम. अय्यर, लेखक अजय चतुर्वेदी आणि यांनी सहभाग घेतला होता तर कार्यक्रमाचे समन्वयन ऐका बॅनर्जी यांनी केले.

चर्चेदरम्यान मान्यवरांनी भारतीय सभ्यतेच्या सातत्याचा उहापोह करताना सांगितले की, भारत ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून ती एक जिवंत चेतना आहे. इजिप्त, मेसोपोटेमिया यांसारख्या प्राचीन सभ्यता कालांतराने लोप पावल्या, मात्र भारतीय सभ्यता आजही अखंडपणे टिकून आहे, यामागील कारणे त्यांनी स्पष्ट केली.

भारतीय परंपरेत काळाची संकल्पना ही केवळ घड्याळावर आधारित नसून ती पंचांग, तिथी, नक्षत्र आणि विश्वाच्या गतीशी निगडित आहे. "महाकाल" या संकल्पनेद्वारे भारतीय संस्कृतीत काळाला दैवी स्थान देण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग आणि कलियुग या चक्रात्मक काळरचनेचा उल्लेख करत, वर्तमान काळ हा परिवर्तनाचा टप्पा असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मान्यवरांनी पुढे सांगितले की, भारतीय ग्रंथ, पुराणे आणि महाकाव्ये ही केवळ कथा नसून ती तत्त्वज्ञान स्पष्ट करणारी माध्यमे आहेत. या ज्ञानपरंपरेत सूत्र, भाष्य आणि कथा यांचा समन्वय आढळतो, ज्यामुळे तत्त्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचते.

तसेच, आजच्या काळात भारतीय समाजासमोर ओळख संकट (identity crisis) निर्माण झाल्याचे नमूद करून, मूळ मूल्यव्यवस्थेकडे परत जाण्याची आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. ज्ञान केवळ वाचनापुरते मर्यादित न ठेवता ते आचरणात आणणे आवश्यक असल्यावर भर देण्यात आला.

या चर्चासत्रातून भारतीय सभ्यतेचा गाभा हा सत्य, धर्म आणि निसर्गाशी सुसंगती यावर आधारित असल्याचे स्पष्ट झाले. भविष्यात भारताची ही तात्त्विक परंपरा जागतिक पातळीवर मार्गदर्शक ठरू शकते, असे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयक ऐका बॅनर्जी यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. तसेच अशा प्रकारचे संवाद शैक्षणिक स्तरावर, विशेषतः शाळांमध्ये नेण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

मॅक्स सिटी लिटफेस्ट २०२६' (Max City Litfest 2026) च्या दोन दिवसांच्या कार्यक्रमात भव्य साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.. या महोत्सवात साहित्य, कला, इतिहास आणि संरक्षण अशा विविध विषयांवर मंथन करण्यात आले.

पहिल्या दिवशी प्रामुख्याने मुंबई शहराचे भविष्य आणि भारताच्या गौरवशाली लष्करी इतिहासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे तर दुसऱ्या दिवशी ज्ञान, तंत्रज्ञान आणि भविष्यातील भारत या विषयांवर विविध मान्यवराने आपले मत व्यक्त केली तसेच या महोत्सवात वंदना कृष्णा यांचे कला प्रदर्शन देखील सर्वांसाठी खुले होते.

# दोन मेट्रो मार्गिकांचे लोकार्पण ३ एप्रिलला

**मुंबई, प्रतिनिधी**

दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो-९ मार्गिकचा दहिसर-काशिगाव टप्पा १ आणि मेट्रो-२ व मार्गिकतील डायमंड गार्डन ते मंडाले टप्पा १ यांचे लोकार्पण ३ एप्रिलला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यासोबतच पॉड टॅक्सीचे भूमिपूजनही केले जाणार आहे.

दहिसर ते गुंदवली मेट्रा ७मार्गिकचा उत्तर टोकाकडील विस्तार म्हणजे मेट्रो-९ मार्गिका. या मार्गिकच्या दहिसर ते काशिगाव या पहिल्या टप्प्याचे काम गेल्या वर्षअखेरीस पूर्ण झाले होते. जानेवारीत सीएमआरएस प्रमाणपत्रही मिळाले. तसेच अंधेरी पश्चिम ते मंडाळे मेट्रो-२ व मार्गिकेच्या मंडाळे ते डायमंड गार्डन या पहिल्या टप्प्याला सीएमआरएस प्रमाणपत्र मिळूनही लोकार्पण रखडले आहे.

झाल्यास मेट्रो-९ सुरू गुंदवलीपासून थेट काशिगावपर्यंत मेट्रोने प्रवास करता येईल. तसेच मेट्रो-२ ब सुरू झाल्यास पूर्व उपनगराला पहिली मेट्रो मिळणार आहे. मेट्रो-२ व मार्गिकेचा पहिला टप्पा ५.५३ किमी लांबीचा आहे, तर मेट्रो-९ मार्गिकचा पहिला टप्पा ४.४ किमीचा आहे. वांद्रे रेल्वे स्थानकापासून ते कुर्ला रेल्वे स्थानकापर्यंत पॉड टॅक्सी प्रकल्प उभारला जाणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात रोज ये-जा करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या प्रवासाची सोय यामुळे होईल, असे सांगितले जाते. या प्रकल्पाची उभारणी आणि संचालन करण्यासाठी वर्षभरापूर्वीच संस्थेची नियुक्ती केली आहे. मेट्रो प्रकल्पांच्या लोकार्पणासोबतच पॉडटॅक्सी प्रकल्पाचे भूमिपूजन केले जाणार आहे.

# अठरा कोटींचे सोन्याचे दागिने घेऊन कारागिराचे पलायन

**मुंबई, प्रतिनिधी**



सुमारे अठरा कोटींच्या सोन्याचा अपहार करून एका कारागिराने पलायन केल्याची घटना झव्हेरी बाजार परिसरात घडली. माणिक मदन धला असे या कारागिराचे नाव असून त्याच्याविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

यातील तक्रारदार बोरिवली परिसरात राहात असून ते ज्वेलर्स व्यापारी आहेत. त्यांचा होल-सेलमध्ये दागिने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. माणिक हा त्यांचा परिचित कारागीर असून त्याचे झव्हेरी बाजार येथील दादीशेठ अग्यारी लेन, पहिल्या मजल्यावरील रुम क्रमांक वीसमध्ये एक वर्कशॉप आहे. त्यांनी त्याच्याकडून अनेकदा दागिने बनवून घेतले होते, दागिने दुरुस्तीसह पॉलिशसाठी दिले होते. कामात हुशार असल्याने त्याच्यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी त्याला अठरा कोटींचे १४७० ग्रॅम वजनाचे विविध सोन्याचे दागिने दुरुस्तीसह पॉलिशसाठी दिले होते. मात्र ते दागिने दिलेल्या मुदतीत परत न करता माणिक हा वर्कशॉप बंद करून पळून गेला होता. तीन महिने उलटूनही तो त्यांना सापडला नाही. त्यामुळे त्यांनी माणिकविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध अठरा कोटीच्या दागिन्यांचा अपहार करून ज्वेलर्सची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तो पळून गेल्याने त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. माणिक हा मस्जिद बंदर येथे राहात असून तो त्याच्या गावी पळून गेल्याचे बोलले जाते. त्यामुळे एक टीम त्याच्या अटकेसाठी गावी जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# धारावीतील सर्वेक्षण अद्यापही अपूर्ण !

## सर्वेक्षणानंतरच पात्र-अपात्रची अंतिम यादी

**मुंबई, प्रतिनिधी**

धारावीतील सर्वेक्षणादरम्यान सुमारे ९६% रहिवाशांना अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोप नवभारत मेगा डेव्हलपर्स (एनएमडीपीएल) या कंपनीने फेटाळला असून अद्यापही सर्वेक्षणाची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच याबाबतची अंतिम यादी (परिशिष्ट-२) शासनाच्या निकषांनुसार पारदर्शक पद्धतीने प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.



धारावीत ९६ टक्के रहिवासी पात्र असूनही अपात्र ठरवण्यात आल्याचा आरोप मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी दिल्लीत केला होता. धारावी पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या एसपीव्हीचा (स्पेशल पर्पज वेहिकल) भागीदार असलेल्या एनएमडीपीएलने स्पष्ट केले की, अंतिम परिशिष्ट-२ नुसार, गणेश नगर / मेघवाडी येथील सुमारे ७७% रहिवासी पात्र ठरले आहेत. भाडेकरारा वरील लाभार्थी आणि इतर योजनांमध्ये समाविष्ट रहिवासीदेखील यात आहेत.

नाईक नगर येथील अंतिम परिशिष्ट-२ अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. कावळे चाळ परिसरातील काही लोकांकडून वारंवार शासकीय सर्वेक्षणात अडथळा आणण्याचा प्रयत्न होत आहे. कावळे चाळीतील लोकांनी सर्वेक्षणात भागच घेतला नाही, तर सरकार त्यांची पात्रता कशी निश्चित करू शकेल? असा थेट सवालही एनएमडीपीएलने केला. पुनर्विकासात वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांनादेखील भाडेकरार -खरेदी किंवा अल्प भाडेकरार योजनेत हक्काचे घर दिले जाईल. धारावीतील खालच्या मजल्यावरील पात्र रहिवाशांना धारावीतच घर देणार असल्याचे या आधीच शासनाने स्पष्ट केले आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### भूसंपादन न झाल्यास मालकाचा हक्क अबाधित

**मुंबई, प्रतिनिधी**

विकास आराखड्यात आरक्षित केलेली जमीन १० वर्षांनंतरही संपादित न केल्यास ते आरक्षण रद्द झाल्याचे मानले जाईल. तसेच जमीन मालकाचा अधिकार अबाधित राहील, असा निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. न्या. रवींद्र घुगे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ अंतर्गत हा निर्णय दिला. फलटण येथील नीलेश प्रकाशराव मोरे यांनी ॲड. यतिन मालवणकर यांच्यामार्फत याचिका दाखल केली होती. त्यांच्या १८ एकर जमिनीवर १९९२ पासून प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी आरक्षण टाकण्यात आले होते. अनेक वर्षे उलटूनही प्रशासनाने ना जमीन संपादित केली, ना मोरे यांना तिथे विकास करण्याची परवानगी दिली. शेवटी नोव्हेंबर २०१५ मध्ये त्यांनी प्रशासनाला खरेदी नोटीस बजावली होती. एखादी जमीन विकास आराखड्यात १० वर्षांपर्यंत संपादित केली गेली नाही, तर मालक प्रशासनाला नोटीस देऊ शकतो. या नोटिशीच्या २४ महिन्यांच्या आत सरकारने भूसंपादन सुरू केले नाही, तर ते आरक्षण आपोआप रद्द होते, असे निरीक्षण न्यायमूर्ती घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने नोंदवले. केवळ नियोजनाच्या नावाखाली मालकाला त्याच्या जमिनीच्या वापरापासून अनिश्चित काळासाठी वंचित ठेवता येणार नाही, असे नमूद करीत न्यायालयाने जमीनमालकाला मोठा दिलासा दिला.

### अटल सेतूवरून २६ महिन्यांत २ कोटी वाहनांचा प्रवास

**मुंबई, प्रतिनिधी**

अटल सेतूचे लोकार्पण होऊन दोन वर्षांहून अधिक काळ लोटला असून आतापर्यंत या पुलावरून २ कोटींहून अधिक वाहनांच्या प्रवासाची नोंद झाली आहे. २७ मार्च २०२६ रोजी २ कोटी ३१६ व्या वाहनाने हा पूल ओलांडला. अटल सेतूवरून प्रवास करणाऱ्या वाहनांमध्ये १ कोटी ८१ लाख ९५ हजार ७१८ इतकी खासगी वाहनांची संख्या आहे. हा आकडा एकूण वाहतुकीच्या ९१ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. तसेच ५ लाख ९८ हजार ५२५ लघु व्यावसायिक वाहने, मिनीबस, बस आणि ट्रक यांनीही अटल सेतूवरून प्रवास केला. १२ लाख ६ हजार ७३ मध्यम, जड आणि अति अवजड वाहनांच्या वाहतुकीची नोंद झाली. अटल सेतू दक्षिण मुंबईतील शिवडीला नवी मुंबईतील चिरले या गावाशी जोडतो. या रस्त्यामुळे एक तासाचा प्रवास २० मिनिटांत करता येतो.

### मेडिकल कौन्सिल निवडणुकीत दबाव माजी पदाधिकाऱ्यांच्या उमेदवारांना धमकी

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दबाव आणला जात असल्याचा आरोप केला जात आहे. २६ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीत माजी पदाधिकाऱ्यांच्या पॅनलमधील उमेदवारांना धमकीचे फोन येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. सुहास पिंगळे यांनी ही गंभीर बाब उघड केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, उमेदवारांना "माघार घ्या, आमच्याकडे या; अन्यथा सरकारी रोष ओढवून घ्याल," अशा आशयाचे फोन येत आहेत. या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून वैद्यकीय स्वायत्ततेवर गदा येत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. या दबावामुळे पॅनलमधील एका उमेदवाराने माघार घेतल्याची माहितीही समोर आली आहे, तर उर्वरित उमेदवारांवरही अशाच प्रकारचा दबाव टाकला जात असल्याचे सांगितले जात आहे. या घडामोडींमुळे राज्यातील डॉक्टरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. "ही केवळ निवडणूक नसून वैद्यकीय स्वायत्तता टिकवण्याची लढाई आहे," असे मत डॉ. पिंगळे यांनी व्यक्त केले. दबाव, दडपशाही आणि भीतीचे राजकारण लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवत असल्याची टीकाही त्यांनी केली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. डॉक्टरांनी सजग राहून मतदानाद्वारे योग्य उत्तर द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. "लढा अद्याप संपलेला नाही," असा निर्धारही डॉ. पिंगळे यांनी व्यक्त केला आहे.

### २ मेपासून शाळांना उन्हाळी सुट्टी

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक राज्य मंडळाच्या शाळांना २ मेपासून उन्हाळी सुट्टी जाहीर केली असून शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष १५ जून २०२६ पासून सुरू होणार आहे. दरवर्षी जून महिन्यातील तीव्र उष्णतेचा विचार करून विदर्भातील राज्य मंडळाच्या शाळा साधारणतः ३० जूनपासून सुरू करण्याची पद्धत होती. मात्र यंदा शिक्षण विभागाने हा अपवाद रद्द करत राज्यभर एकसमान वेळापत्रक लागू केले असून, विदर्भासह सर्व विभागांतील शाळा १५ जून पासूनच सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून २८ मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये २ मेपासून विद्यार्थ्यांना अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी लागू होईल. दरम्यान, इतर मंडळांच्या काही शाळांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार किंवा शैक्षणिक उपक्रमांमुळे शाळा सुरू असल्यास, संबंधित शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून सुट्टी जाहीर करण्याबाबत निर्णय घ्यावा, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. जून महिन्यातील वाढत्या तापमानाचा विचार करून, शाळा सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काही दिवसांत केवळ विदर्भातील शाळा सकाळी ७.०० ते ११.४५ या वेळेतच शाळा चालविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा बदल १५ जून ते २७ जून २०२६ या कालावधीत लागू राहील. त्यानंतर, ३० जूनपासून या शाळा नियमित वेळेनुसार सुरू कराव्यात, असेही या परिपत्रकात म्हटले आहे.

### परीक्षा रद्द झालेल्या विद्यार्थ्यांची बीएड सीईटी ५ एप्रिलला होणार

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात आलेल्या बॅचलर ऑफ एज्युकेशन (बीएड) सीईटीदरम्यान शुक्रवारी विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. यावेळी ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द करण्यात आली होती, त्यांची बीएड सीईटी ५ एप्रिल रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती सीईटी सेलच्या वतीने देण्यात आली आहे. गेल्या २७, २८ व २९ मार्च रोजी घेण्यात आलेल्या या बीएडच्या सीईटी परीक्षेला १ लाख १० हजार ४२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यातील ३२ हजार ४९२ विद्यार्थ्यांची परीक्षा रविवारच्या दोन सत्रात आयोजित केली होती. दोन दिवसांपूर्वी तांत्रिक अडचणींमुळे नांदेड, परभणी आणि नागपूर येथील काही परीक्षा केंद्रांवरील परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. या केंद्रांवरील प्रभावित विद्यार्थ्यांसाठी बीएड (जनरल व स्पेशल) व बीएड (इएलसीटी) या परीक्षांची पुनर्परीक्षा रविवार ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे.

### डिजिटल अरेस्टच्या नावाने वृद्धाची १.५७कोटींची फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

डिजिटल अरेस्टच्या बहाण्याने एका वयोवृद्धाची १.५७ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी अशोक पाल या आरोपीस पश्चिम सायबर सेल पोलिसांनी अटक केली. अशोक हा रिक्षाचालक असून त्याने सायबर ठगांना बँक खाती पुरविल्याचा आरोप आहे.तक्रारदार अंधेरी येथे राहत असून डिसेंबर महिन्यात त्यांना एका व्यक्तीने त्यांच्याविरुद्ध अश्लील पोर्नोग्राफी, मनी लाड्रिंगप्रकरणी त्यांची मुंबईसह दिल्ली पोलिसांकडून चौकशी होणार आहे, तसेच सध्या ते डिजिटल अरेस्टमध्ये असून तपासादरम्यान त्यांचे सर्व पैसे पोलीस सांगतील त्या खात्यात जमा करण्यास सांगितले. अटकेच्या भीतीने त्यांनी संबंधित खात्यात १ कोटी ५७ लाख ५० हजार रुपये ट्रान्स्फर केले. मात्र ही रक्कम ट्रान्स्फर होताच त्यांची चौकशी बंद झाली.

# MHT-CET देणाऱ्या ११ लाख विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वीच मिळणार 'रिअल' अनुभव, तोही अगदी मोफत

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यात यावर्षी होणारी MHT-CET 2026 ही परीक्षा अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. यंदा या परीक्षेसाठी विक्रमी ११.४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, ही स्पर्धा आतापर्यंतच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. या अटीतटीच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना यशाची खात्री मिळावी आणि त्यांच्या तयारीला योग्य दिशा मिळावी, यासाठी भारतीय जनता पक्ष (भाजप) मुंबई आणि भारतीय जनता युवा मोर्चा (बीजेवायएम) मुंबई यांनी 'मेरी तयारी' हा एक अनोखा आणि भव्य मोफत मॉक टेस्ट उपक्रम जाहीर केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप मुंबईचे अध्यक्ष श्री. अमित साटम यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विशेष म्हणजे, बाजारात ज्या मॉक टेस्टसाठी १,००० ते २,००० रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते, ती चाचणी 'टार्गेट लर्निंग व्हेंचर्स प्रा.लि.' च्या सहकार्याने सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**मॉक टेस्टचे वेळापत्रक आणि वैशिष्ट्ये**

- चाचणीच्या तारखा: ४ एप्रिल आणि २ मे २०२६.
- वेळ: सकाळी ९ ते दुपारी १२ (प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळेनुसार).
- मूल्यमापन: पहिल्या चाचणीनंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयानुसार अचूकता, गती आणि कमकुवत बाजू समजण्यासाठी सविस्तर परफॉर्मन्स रिपोर्ट दिला जाईल. दुसऱ्या चाचणीमुळे विद्यार्थ्यांना स्वतःमधील सुधारणा तपासता येणार आहे.

**डिजिटल मदतीसाठी 'Tayari Entrance' ॲप**

केवळ मॉक टेस्टच नाही, तर NEET, JEE आणि MHT-CET च्या नियमित तयारीसाठी 'Tayari Entrance' हे मोबाईल ॲपही लाँच करण्यात आले आहे. यामध्ये सराव क्विझ, संकल्पनांचे रिव्हिजन आणि परफॉर्मन्स ट्रॅकिंग अशा सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

नगरसेवक श्री. तजिंदर सिंह तिवाणा आणि बीजेवायएम मुंबईचे अध्यक्ष श्री. दीपक सिंह यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. टार्गेट लर्निंग व्हेंचर्सचे संचालक श्री. अगस्ती लावंड यांच्या मते, ही चाचणी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दडपणातून बाहेर काढण्यास मदत करेल.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://mock.tayari.in/ या संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी त्वरित पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी क्रांती सान्याल (9167335033) यांच्याशी संपर्क साधता येईल.

## प्रतीक्षा नगरचाही आता 'अभ्युदय' होणार! मुंबईत उभ्या राहणाऱ्या राज्यातील सर्वात मोठ्या सहकार भवनाचे थाटात भूमिपूजन

**मुंबई, प्रतिनिधी**



मुंबईच्या सहकार चळवळीला आता हक्काचे आणि आधुनिक छप्पर मिळणार आहे. मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून प्रतीक्षा नगर, सायन येथे साकार होणाऱ्या राज्यातील सर्वात मोठ्या 'सहकार भवन'चे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी उत्साहात पार पडले. या सोहळ्यादरम्यान मुख्यमंत्र्यांनी प्रतीक्षा नगरमधील रहिवाशांना एक मोठी आनंदाची बातमी दिली. अभ्युदय नगरच्या धर्तीवर आता प्रतीक्षा नगरचाही कायापालट करण्यासाठी तातडीने पुनर्विकासाचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश त्यांनी म्हाडाला दिले आहेत.

हे सहकार भवन म्हणजे केवळ एक इमारत नसून सहकार क्षेत्रातील समस्यांचे निवारण करणारे एक प्रमुख केंद्र ठरणार आहे. तळमजला अधिक १० मजले असलेल्या या वास्तूत प्रशस्त ऑडिटोरियम, प्रशिक्षण वर्ग, मीडिया सेंटर आणि वाचनालय अशा जागतिक दर्जाच्या सुविधा असतील. "महाराष्ट्रात सहकार चळवळ मोठी आहे, मात्र गृहनिर्माण संस्थांकडे दुर्लक्ष झाले होते. आता स्वयं-पुनर्विकासाच्या माध्यमातून आम्ही सामान्य मुंबईकराला त्याच्या हक्काचे घर मिळवून देत आहोत," असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. मुंबईत सध्या सुमारे १६०० स्वयं-पुनर्विकासाच्या योजना सुरू असून ही संख्या दुप्पट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रतीक्षा नगरमधील ८८ इमारतींमधील सुमारे ६,२०० भाडेकरू गेल्या ३० वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. या रहिवाशांच्या भावनांची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी म्हाडाच्या उपाध्यक्षांना या परिसराचा आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. दक्षिण मुंबईतील बीडीडी चाळींप्रमाणेच इथल्या नागरिकांनाही हक्काची आणि दर्जेदार घरे मिळवून देण्याचा शब्द त्यांनी दिला. याच कार्यक्रमात 'गृहनिर्माण व्यवस्थापन पुस्तिके'चे अनावरण आणि विक्रोळी येथील मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटनही करण्यात आले.

या सोहळ्याला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा आणि मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. सहकार आणि गृहनिर्माण या दोन्ही आघाड्यांवर मुंबईकरांना मोठा दिलासा देणारा हा दिवस ठरला आहे.

## लैंगिक शोषणासोबतच 'हवाला' रॅकेटचा पर्दाफाश

### एसआयटीच्या हाती मोठे धागेदोरे



**मुंबई, प्रतिनिधी**

भोंदूगिरी आणि महिलांच्या लैंगिक शोषणाने महाराष्ट्र हादरवून सोडणाऱ्या कॅप्टन अशोक खरात याच्या पापाचा घडा आता भरत चालला असून, तपासात एकापेक्षा एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. केवळ महिलांची फसवणूक आणि अत्याचार इथपर्यंतच खरात मर्यादित नव्हता, तर तो चक्क आंतरराष्ट्रीय 'हवाला' रॅकेट चालवत असल्याचे खळबळजनक वास्तव उघड झाले आहे. परदेशात, विशेषतः दुबईत मोठ्या प्रमाणावर पैशांची देवाणघेवाण करण्यासाठी खरात या मार्गाचा वापर करत होता, अशी माहिती एसआयटीच्या तपासात पुढे आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खरातचे जाळे केवळ सर्वसामान्यांपर्यंतच नाही, तर काही बडे राजकीय नेते आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत पसरले होते. हे 'बडे भक्त' त्याला हवाल्याच्या व्यवहारात मदत करत असल्याचा संशय बळावला आहे. एसआयटीला या संदर्भात सबळ पुरावे मिळाले असून, आता हा तपास आर्थिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्याची शक्यता आहे. यामुळे खरातच्या अडचणीत प्रचंड वाढ होणार आहे.

अशोक खरात विरोधात शुक्रवारी रात्री उशिरा नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात आणखी दोन गुन्हे दाखल झाले आहेत. एका विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, पतीसोबत सुरू असलेला वाद सोडवण्यासाठी ती खरातकडे गेली असता त्याने तिला गाठले. "मी महादेवाचा अवतार आहे, माझ्याशी शरीरसंबंध ठेवल्यास तुझी संकटे दूर होतील आणि नकार दिल्यास तुझ्या पतीचा व मुलाचा मृत्यू होईल," अशी भीती घालून त्याने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले. खरातने बहुतांश महिलांना याच एका 'मोडस ऑपरेंडी'ने आपल्या जाळ्यात ओढल्याचे समोर आले आहे.

**गुन्ह्यांचे 'शतक' पार करण्याची शक्यता?**

खरात विरोधात आतापर्यंत एकूण १० गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी ८ गुन्हे लैंगिक शोषणाचे तर २ गुन्हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. नेवासा येथील एका व्यावसायिकाला 'व्यापारात बरकत' मिळवून देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांच्या अंगठ्या विकून फसवणूक केल्याचाही गुन्हा यात सामील आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पोलीस हेल्पलाईनवर खरात विरोधात आतापर्यंत १०० पेक्षा अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ज्या महिला आणि पुरुषांची फसवणूक झाली आहे, त्यांनी न घाबरता पुढे येण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सध्या खरात एसआयटीच्या कोठडीत असून, त्याच्या लॅपटॉप आणि मोबाईलमधील रेकॉर्डिंगमधून अनेक बड्या नावांचे चेहरे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. 'हवाला' रॅकेटच्या माध्यमातून त्याने किती काळा पैसा पांढरा केला आणि त्यामागे कोणती राजकीय शक्ती होती, याचा तपास आता वेगाने सुरू आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांनो सावधान! 'हे' एक काम राहिले तर एप्रिलचे वेतन अडकणार

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील लाखो सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि तितकीच सावध करणारी बातमी समोर आली आहे. राज्य शासनाच्या 'सेवार्थ' प्रणालीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने आता 'ई-केवायसी' (e-KYC) प्रक्रिया अनिवार्य केली असून, जी पूर्ण न केल्यास कर्मचाऱ्यांचे पुढच्या महिन्याचे वेतन रोखले जाऊ शकते. या निर्णयामुळे प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे.

शासकीय तिजोरीतून होणाऱ्या वेतनाचा हिशोब अचूक राहावा आणि एकाच कर्मचाऱ्याची दुबार नोंद होऊन होणारी संभाव्य आर्थिक गळती रोखली जावी, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. राज्य शासनाच्या ताज्या परिपत्रकानुसार, एप्रिल २०२६ आणि मे २०२६ या महिन्यांचे वेतन मिळवण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. जर ही प्रक्रिया निर्धारित कालावधीत पूर्ण झाली नाही, तर संबंधितांचे वेतन सॉफ्टवेअर प्रणालीतूनच रोखले जाण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

हा निर्णय केवळ मंत्रालयीन विभागांपुरता मर्यादित नसून, राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, अनुदानित शाळा, महाविद्यालये, कृषी व पशुसंवर्धन संस्था, आदिवासी आश्रमशाळा तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांनाही लागू असणार आहे. त्यामुळे गावपातळीपासून ते मंत्रालयापर्यंतच्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आता आपले बायोमेट्रिक किंवा आधार संलग्न प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करावे लागणार आहे.

## वैद्यकीय शिक्षणातील मूल्यमापन पद्धतीत बदलांची गरज

**मुंबई, प्रतिनिधी**

'असेसमेंट इनोव्हेशन : मल्टिपल चॉईसच्या पलीकडे' या विषयावर 'पल्स २०२६' अंतर्गत जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी तज्ज्ञांनी पारंपरिक मल्टिपल चॉईस (एमसीक्यू) परीक्षांच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे सर्वांगीण मूल्यमापन करण्याची गरज अधोरेखित केली. केवळ सैद्धांतिक ज्ञानावर आधारित परीक्षा अपुरी ठरत असून प्रत्यक्ष परिस्थितीत निर्णयक्षमता, संवादकौशल्य, तणावात काम करण्याची क्षमता तसेच रुग्णांशी वागण्याची पद्धत यांचे मूल्यमापन करणेही आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या चर्चासत्रात ग्रँट मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अजय रंधारवर, डॉ. गौतम खन्ना, मेट्रोपोलिस फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. दुरू शाह, उत्तर प्रदेशातील केजीएमयूच्या वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रमुख व नर्सिंग अधिष्ठाता डॉ. अमिता पांडे तसेच युनिव्हर्सिटी ऑफ लीड्सच्या ग्लोबल एंगेजमेंट अँड एज्युकेशन विभागाचे प्रा. डॉ. पृथ्वी सुकुमार यांनी सहभाग घेतला.

चर्चेदरम्यान ओएससीई (ऑब्जेक्टिव्ह स्ट्रक्चर्ड क्लिनिकल एक्झामिनेशन), सिम्युलेशन-आधारित प्रशिक्षण, डिजिटल साधनांचा वापर आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन या पद्धतींचा अधिक व्यापक अवलंब करण्यावर भर देण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष कामासाठीची तयारी अधिक सक्षम होईल, असे तज्ज्ञांनी नमूद केले.

तसेच, भारतात 'कॉम्पिटन्सी बेस्ड मेडिकल एज्युकेशन' (सीबीएमई) सुरू झाल्यानंतर काही सकारात्मक बदल दिसून आले असले, तरी त्याची अंमलबजावणी अद्याप अपेक्षित पातळीवर प्रभावी झालेली नाही, असेही सांगण्यात आले. विशेषतः अध्यापन आणि मूल्यमापन यांमधील विसंगती दूर करण्याची गरज तज्ज्ञांनी अधोरेखित केली.

## महाराष्ट्रात पीएनजी जाळ्याच्या विस्तारासाठी केंद्राचे आर्थिक व तांत्रिक सहाय्य आवश्यक – मंत्री छगन भुजबळ

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) पुरवठा करणाऱ्या जाळ्याचा वेगाने विस्तार करण्यासाठी केंद्र सरकारने तांत्रिक मदत आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. ही बैठक केंद्रीय शहरी विकास व गृहनिर्माण मंत्री मनोहर लाल खट्टर आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीस केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली व उत्तर प्रदेशातील नगरविकास व अन्न-नागरी पुरवठा मंत्री, केंद्रीय सचिव, तसेच महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, विविध महानगरपालिकांचे आयुक्त आणि नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री भुजबळ यांनी पीएनजी विस्तारासाठी राज्य सरकारने उचललेल्या उपाययोजनांची माहिती दिली. अनेकदा शेजाऱ्यांची संमती न मिळणे किंवा महानगरपालिकांकडून रस्ते खोदाईच्या परवानग्यांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम रखडते. ही अडचण दूर करण्यासाठी 'गृहित परवानगी' (डीम्ड परमिशन) तत्त्व लागू करण्यात आले आहे. यानुसार, संबंधित विभागांकडे परवानगीसाठी अर्ज केल्यानंतर ठराविक कालावधीत प्रतिसाद न मिळाल्यास परवानगी मिळालेली समजून काम पुढे नेता येईल.

तसेच, नव्या गृहनिर्माण प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पीएनजी जोडणी बंधनकारक करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ज्या गृहनिर्माण सोसायट्यांपर्यंत गॅस पाइपलाइन पोहोचली आहे, त्या ठिकाणी जोडणी घेतल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शहरी भागात एलपीजी सिलिंडरचा वापर कमी करून पीएनजीचा वापर वाढवण्यासाठी सरकार अधिक गतिमान आणि कठोर पावले उचलत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट आणि लघुउद्योगांमध्ये पीएनजीचा वापर वाढवणे आवश्यक असून, त्यामुळे खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. यासाठी परवाना व जोडणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गॅस वितरण कंपन्यांना आता २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली असून कामकाजाचा हंगामही शिथिल करण्यात आला आहे. तसेच, रस्ते पूर्ववत करण्यासाठी लागणारे शुल्क माफ करण्याबाबत मार्गदर्शक सूचना शासन निर्णयाद्वारे जारी करण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेसाठी प्रशासकीय समन्वय राखण्यासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांना राज्याचे नोडल अधिकारी घोषित करण्यात आले आहे. हे आदेश ३० जून २०२६ पर्यंत लागू राहतील.

## ई-शासनात पर्यावरण विभाग पाचव्या स्थानी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष गौरव

**मुंबई, प्रतिनिधी**



राज्य शासनाच्या '१५० दिवसांच्या कृती आराखड्या'अंतर्गत राबविण्यात आलेल्या ई-शासन कार्यक्रमात पर्यावरण व हवामान बदल विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १५९.२९ गुणांसह मंत्रालयीन विभागांमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाच्या सचिव जयश्री भोज यांचा आज गौरव करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशाबद्दल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्यावर विशेष भर देण्यात आला. ई-ऑफिस, डॅशबोर्ड, पोर्टल एकात्मिकरण तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विभागाची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे. पुढील काळातही डिजिटल सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील.

विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार तसेच विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचेही त्यांनी नमूद केले.

१५० दिवसांच्या ई-शासन कार्यक्रमांतर्गत पर्यावरण व हवामान बदल विभागाने डिजिटल सेवा, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख उपक्रमांवर विशेष भर दिला. विभागाच्या संकेतस्थळाला दररोज सुमारे ३,००० नागरिक भेट देत असून ते दिव्यांगांसाठी सुलभ (WCAG २.१) आणि सायबर सुरक्षिततेच्या निकषांनुसार विकसित करण्यात आले आहे.

'आपले सरकार' पोर्टलवर विभागाच्या सर्व ७ सेवा पूर्णपणे ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच 'मैत्री', 'ईसीएमपीसीबी (ECMPCB)' आणि इतर पोर्टल्सशी एकात्मिक व्यवस्था निर्माण करण्यात आली असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा मिळू लागल्या आहेत.

ई-ऑफिस प्रणालीमुळे कामकाजाला गती मिळाली असून मे २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत सुमारे ५,४५० फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. सरासरी ७ दिवसांत फाईल निपटारा होत असल्याने प्रशासन अधिक कार्यक्षम झाले आहे.

तक्रार निवारण यंत्रणेतही सुधारणा करण्यात आली असून बहुतांश तक्रारी ७ ते १५ दिवसांत निकाली काढल्या जात आहेत. तसेच डॅशबोर्ड प्रणालीमुळे कामकाजाचे प्रत्यक्ष-वेळेतील (रिअल-टाईम) निरीक्षण शक्य झाले आहे.

याशिवाय, व्हॉट्सॲप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक सोप्या व पारदर्शक करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बांधकाम व पाडकाम कचरा परवानगी सेवा व्हॉट्सॲपद्वारे उपलब्ध करून देण्याचा अभिनव उपक्रमही राबविण्यात येत आहे.

या यशामुळे पर्यावरण विभागाच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली असून नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देणे सुलभ होणार आहे.

## २१ प्रवर्गांतील दिव्यांगांना शासन योजनांचा लाभ – सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई, प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत निर्धारित सर्व २१ प्रवर्गांतील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन तसेच संबंधित यंत्रणांच्या विविध योजना, सवलती, लाभ, अनुदान आणि इतर सुविधांसाठी पात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे दिव्यांगांच्या सर्वसमावेशक सक्षमीकरणाला चालना मिळणार असून, राज्यातील अधिकाधिक दिव्यांग नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, अशी माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले की, यापूर्वी १९९५ च्या अधिनियमानुसार केवळ ७ प्रवर्गांपुरते मर्यादित असलेले लाभ आता विस्तारून सर्व २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध होणार आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ लागू झाल्यानंतरही काही शासकीय कार्यालयांमध्ये जुन्या निकषांनुसारच लाभ दिला जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे नव्याने समाविष्ट झालेल्या प्रवर्गांतील दिव्यांगांना योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट, एकसंध आणि सर्वसमावेशक धोरण निश्चित करत हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त, मेंदूचा पक्षाघात, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्लहल्ला पीडित, पूर्ण अंधत्व, अंशतः अंधत्व, कर्णबधिरता, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अपंगत्व, विशिष्ट अध्ययन अक्षम्यता, स्वमग्नता (ऑटिझम), मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, पार्किन्सन, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकल सेल, मज्जासंस्थेचे तीव्र आजार तसेच बहुविकलांगता अशा सर्व २१ प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीकडे किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले वैध 'युनिक डिसॅबिलिटी आयडेंटिटी' (UDID) कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच कायमस्वरूपी दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारकांनाच या योजनांचा लाभ मिळणार असून, तात्पुरत्या प्रमाणपत्रधारकांना हा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

या निर्णयामुळे राज्यातील दिव्यांग नागरिकांना शासकीय योजनांचा अधिक व्यापक आणि प्रभावी लाभ मिळण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### काँग्रेसची आज शेतकरी संघर्ष न्याय यात्रा

**मुंबई, प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने उद्या, सोमवारी धाराशिव जिल्ह्यात शेतकरी संघर्ष न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ३० मार्च रोजी धाराशीव जिल्ह्यातील सुरतगाव ते तुळजापूर अशी पदयात्रा निघणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या संघर्ष यात्रेत पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि शेतकरी सहभागी होणार आहेत. पदयात्रेची सुरुवात सोलापूर तुळजापूर महामार्गावरील सुरतगाव येथून सकाळी आठ वाजता होणार असून संध्याकाळी पाच वाजता तुळजापूर येथील शारदा मंगल कार्यालयात सभेने या यात्रेचा समारोप होणार आहे.

### ऑनलाईन पेमेंट प्रक्रियेत १ एप्रिलपासून मोठे बदल

**मुंबई, प्रतिनिधी**

ऑनलाईन पेमेंटची सुरक्षितता वाढावी, नागरिकांची फसवणूक टळली जावी, यासाठी रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ऑनलाईन पेमेंटशी संबंधित प्रक्रियेत येत्या १ एप्रिलपासून बदल केले आहेत. यापूर्वी ऑनलाईन व्यवहारांसाठी केवळ पिन क्रमांक पुरेसा होता. आता पासवर्ड किंवा पिन, वनटाईम पासवर्ड (ओटीपी), बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख यांसारखा बायोमेट्रिक पासवर्ड, हार्डवेअर टोकन यासारख्या पद्धतीचा वापर केला जाईल. आता प्रत्येक पेमेंटसाठी किमान दोन पडताळणी पद्धती आवश्यक असतील. मोबाईल पिन, यूपीआय पिन, फिंगरप्रिंट, ओटीपी अशा इतर पर्यायांची निवड करावी लागेल. लहान रकमेच्या पेमेंटसाठी कमी तपासणी केली जाईल. मोठ्या रकमेसाठी अतिरिक्त पडताळणी आवश्यक असेल. याला रिस्क बेस्ड ऑथेंटिकेशन (जोखीमआधारित प्रमाणीकरण) म्हणतात. परदेशी संकेतस्थळ किंवा ॲप्सवर केलेल्या पेमेंटसाठी, हे नियम १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू केले जातील.

### तापमानात घट, पण उकाडा कायम

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये तापमानामध्ये थोडी घट झाली असली तरी उकाडा कायम आहे. सांताक्रुझ वेधशाळेमध्ये शनिवारी कमाल ३४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवस त्याचीच पुनरावृत्ती अपेक्षित आहे. आठवड्याच्या सुरुवातीच्या दिवसांच्या तुलनेत वीकेंडमध्ये तापमान पस्तीशीच्या खाली आले तरी दुपारी उन्हाचे चटके बसत आहेत. उन्हामध्ये फिरल्यास उष्माघात बाधित रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भर उन्हात फिरणे टाळा, असा सल्ला मुंबई महानगरपालिकेने मुंबईकरांना दिला आहे. उष्माघात यासारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. पालिकेच्या हॉस्पिटलमध्ये उष्माघात बाधित रूग्णांसाठी वातानुकूलित रूग्णशय्या व औषधे उपलब्ध ठेवण्यात आली आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानामध्येही उष्माघाताच्या रुग्णांवर उपचार केले जाणार असल्याचे एका वैद्यकीय अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

### बोरिवलीतील पीजी गेस्ट हाऊसमध्ये महिलेची आत्महत्या

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

बोरिवलीतील नारायण पीजी गेस्ट हाऊसमध्ये राहणाऱ्या जिया अशोक गदर (३५) या महिलेने आत्महत्या केली. या आत्महत्येमागील अधिकृत कारण समजू शकले नाही, मात्र घरगुती वादातून तिने गळफास घेऊन जीवन संपविल्याचे बोलले जाते. याप्रकरणी बोरिवली पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करुन तपास सुरु केला आहे. जिया ही मूळची गुजरातची रहिवासी असून अविवाहित होती. गेल्या काही वर्षांपासून मुंबई शहरात वास्तव्यास होती. बोरिवलीतील महिलांसाठी असलेल्या नारायण पीजी गेस्ट हाऊसमध्ये ती राहत होती. सध्या ती वांद्रे येथील सलूनमध्ये कामाला होती. दुपारी ती तिच्या रुममध्ये होती. दुपारी रुममध्ये कोणीही नसताना तिने छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. हा प्रकार नंतर इतर महिलांच्या लक्षात येताच त्यांनी बोरिवली पोलिसांना ही माहिती दिली होती. या माहितीनंतर बोरिवली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जियाला पोलिसांनी तातडीने जवळच्या शताब्दी रुग्णालयात दाखल केले, तिथे तिला मृत घोषित करण्यात आले.

### धारावी पुनर्विकास सर्वेक्षण; अनेक जण पात्र असून अपात्र - वर्षा गायकवाड

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील धारावीमध्ये अलीकडील सर्वेक्षणात रहिवाशांना अपात्र ठरवण्यात येत आहे, असा गंभीर आरोप वर्षा गायकवाड यांनी केला. धारावी पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात वर्षा गायकवाड यांनी संसदेत गंभीर मुद्दे उपस्थित केले आणि सरकारवर थेट आरोप केले. लोकसभेत शून्य प्रहरात बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, धारावीतील अलीकडील सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणावर रहिवाशांना अपात्र ठरवण्यात येत आहे. कावले चाळ येथे १००० पैकी केवळ ३१ जण, मेघवाडीमध्ये ५०५ पैकी ५५ जण, तर नाईक नगरमध्ये २२२९ पैकी फक्त २१ जण पात्र ठरले आहेत. पुनर्विकासाचा दावा असतानाही हजारो लोकांना एकाच वेळी अपात्र करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोपही त्यांनी केला. धारावीमध्ये सध्या भीतीचे वातावरण असून, सर्वेक्षण प्रक्रियेत गुंडांचा वापर केला जात आहे. सर्वेक्षण प्रक्रियेत पात्र ठरवण्यासाठी नागरिकांकडून पैशांची वसुली केली जात आहे, असेही आरोप त्यांनी केले.

### १,५६६ किमी रस्ते सिमेंट काँक्रिटचे

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगरांतील रस्ते खड्डे मुक्तीच्या दिशेने वाटचाल करत आहेत. मुंबईत मोठ्या प्रमाणात सिमेंट कॉंक्रीटची कामे सुरू असून आतापर्यंत २,११८ किमी रस्त्यापैकी १,५६६ किमी रस्ते सिमेंट कॉंक्रेटचे झाले आहेत. तर उर्वरित रस्ते येत्या पाच वर्षात पूर्ण करण्याचे टार्गेट मुंबई महापालिकेने ठेवले आहे. मुंबईतील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी सुमारे तीन वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका आयुक्तांना सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्यावर भर देण्याची निर्देश दिले होते. त्यानुसार मुंबईत रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत सर्व उपनगरातील २,२१८ किमी लांबीचे रस्ते आहेत. सध्या ७०० किमी लांबीच्या रस्त्यांची कामे दोन टप्प्यात हाती घेण्यात आली आहेत. यापैकी ३६० किमी लांबीच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे आतापर्यंत १,५६६ किमी रस्ते व रस्त्याच्या बाजूच्या पट्ट्यांची सिमेंट काँक्रिटीमध्ये सुधारणा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. टप्पा १ मध्ये ८० टक्के काम पूर्ण झाले असून टप्पा दोन मध्ये ५५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा एक अंतर्गत असलेली कामे मे २०२६ पर्यंत तर टप्पा दोन अंतर्गत असलेली कामे डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

### रुग्णालयांत अनुभवानुसारच नियुक्त्या

**मुंबई, प्रतिनिधी**

महापालिकाच्या १६ उपनगरीय रुग्णालयांतील महत्त्वाच्या पदांवरील नियुक्त्या आता अनुभवानुसारच करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे येथील मनमानी कारभार आता थांबणार आहे. मोठ्या रुग्णालयांसाठी मेडिकल सुपरिंटेंडंट एमएस, तर लहान रुग्णालयांसाठी चीफ मेडिकल ऑफिसर (सीएमओ) अशी पदरचना आहे. याशिवाय काही ठिकाणी डेप्युटी मेडिकल सुपरिंटेंडंट (डेप्युटी एमएस) पदेही अस्तित्वात आहेत. मात्र, ही सर्व महत्त्वाची पदे सध्या मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. गंभीर बाब म्हणजे, या रिक्त पदांवर अनुभवाचा निकष डावलून कनिष्ठ डॉक्टरांना 'ॲक्टिंग इन्चार्ज म्हणून नियुक्त केल्याचे प्रकार घडत होते. हा प्रकार अतिरिक्त आयुक्तांच्या लक्षात आल्यानंतर तातडीने सुधारणा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यानुसार, सर्वप्रथम संबंधित डॉक्टरांची वरिष्ठता यादी तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर त्या यादीनुसारच टप्प्याटप्प्याने डॉक्टरांकडून इच्छुकता मागवली जाईल. इच्छुकतेच्या आधारेच सीएमओ, डेप्युटी एमएस पदांवर नियुक्त्या करण्यात येणार आहेत.

## संपादकीय

# माओवादातून मुक्तीचा क्षण

**माओवादातून मुक्तीची वेळ जवळ येत असताना, बस्तरमध्ये २५ लाखांचे बक्षीस जाहीर असलेला माओवादी सरगना पापा राव याने आपल्या १७ साथीदारांसह ज्या प्रकारे शस्त्रे खाली ठेवली, तो माओवाद्यांच्या या सर्वात मोठ्या गडामध्ये माओवादी हिंसाचाराच्या समाप्तीचा एक निर्णायक क्षण मानणे स्वाभाविक आहे. कारण तो या भागातील शेवटचा मोठा माओवादी सरगना मानला जात होता. देश माओवादातून मुक्तीच्या उंबरठ्यावर पोहोचणे ही अत्यंत मोठी कामगिरी आहे. या यशाचे पूर्ण श्रेय मोदी सरकारला आणि विशेषतः गृहमंत्री अमित शहा यांना जाते, ज्यांनी ठराविक कालावधीत माओवाद्यांना शरण येण्यास भाग पाडण्याचा संकल्प केला. हा संकल्प पूर्ण होत असल्याचे दिसून येत आहे, कारण सुरक्षा दलांनी व्यापक आणि अधिक प्रभावी रणनीतीच्या माध्यमातून माओवाद संपवण्याची मोहीम हाती घेतली. या मोहिमेत माओवादग्रस्त सर्व राज्यांनी आणि त्यांच्या सुरक्षा दलांनी पूर्ण सहकार्य दिले, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. माओवाद अनेक दशकांपासून देशासाठी डोकेदुखी आणि अंतर्गत सुरक्षेसाठी मोठा धोका ठरत होता, त्यामागे पूर्वीच्या सरकारांनी आवश्यक तेवढी ठाम भूमिका घेतली नव्हती, हेही एक कारण होते. आता माओवाद शेवटच्या टप्प्यात दिसत असताना, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की ग्रामीण भागातील शस्त्रसज्ज माओवादी जरी असहाय्य दिसत असले, तरी 'अर्बन नक्सल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या समर्थकांकडे दुर्लक्ष करता कामा नये. हेच समर्थक माओवादी संघटनांना वैचारिक आधार पुरवत आले आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी निराश झालेल्या माओवाद्यांना पुन्हा डोके वर काढण्याची संधी देऊ नये. ही हिंसक विचारधारा कोणत्याही परिस्थितीत पुन्हा वाढू नये. माओवाद ही अतिवादी आणि सुसंस्कृत समाजाला आव्हान देणारी विषारी व परकीय विचारधारा आहे. त्यामुळे या विचारधारेचा मुकाबला वैचारिक पातळीवरही करणे आवश्यक आहे. तसे करताना हेही लक्षात ठेवावे लागेल की गरीब, वंचित ग्रामीण आणि विशेषतः वनवासी यांच्या हितांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली ही विचारधारा वाढली असून, तिला वेळोवेळी राजकीय संरक्षणही मिळाले आहे. माओवादी भोळ्या-भाबड्या ग्रामीणांच्या हिताच्या नावाखाली कमिशनखोरी आणि खंडणी वसूल करणाऱ्या टोळ्यांमध्ये रूपांतरित झाले होते, त्यामुळे ते अधिक बळकट होत गेले. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे त्यांनी विविध मार्गांनी आधुनिक शस्त्रे आणि स्फोटके मिळवण्यातही यश मिळवले. हे सर्व प्रत्येकाने—विशेषतः माओवाद्यांचे गुप्त समर्थक आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्यांनी—समजून घेणे आवश्यक आहे की माओवादासारख्या विनाशकारी विचारधारेसाठी या देशात कोणतेही स्थान असू शकत नाही.**

## ट्रम्पसाठी व्हिएतनाम ठरणारा इराण; निक्सन आणि बुश यांच्याशी होणार तुलना

इराणविरुद्ध युद्ध सुरू करण्यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कदाचित असा विचार केला असेल की अवघ्या चार दिवसांत या युद्धाचा निकाल लागेल. मात्र हा संघर्ष महिन्याहून अधिक काळ लांबला असून, तो लवकर थांबेल अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. या काळात अमेरिकेचे सुमारे ४० अब्ज डॉलर्स खर्च झाले आहेत. रणांगणावर सैनिक न उतरवण्याचा वारंवार दावा करूनही ट्रम्प यांना सुमारे सात हजार मरीन आणि पॅराशूट सैनिक पाठवावे लागत आहेत. तरीही इराण पराभव मानण्यास किंवा थेट चर्चेला तयार नाही. अमेरिकन काँग्रेस आणि संयुक्त राष्ट्रांची परवानगी न घेता, इराणच्या अणु आणि क्षेपणास्त्र धोक्यापासून संरक्षणाच्या नावाखाली सुरू केलेल्या या युद्धाने संपूर्ण जगाला गंभीर आर्थिक संकटात ढकलले आहे. कारण, प्रचंड विध्वंसामुळे संतप्त झालेल्या इराणने आता आपल्याकडील ४५४ किलो संवर्धित युरेनियम देण्यास किंवा बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रम मर्यादित करण्यास नकार दिला असून, होर्मुज जलमार्गावर नियंत्रण मिळवण्याचा निर्धार केला आहे. इराणच्या देखरेखीखाली काही जहाजे सोडली तर हा जलमार्ग मागील महिन्याभरापासून जवळजवळ बंद आहे. त्यामुळे तेल, वायू, खत, हीलियम आणि प्लास्टिकच्या कच्च्या मालाची टंचाई निर्माण झाली आहे. भारत, चीन, जपान आणि दक्षिण कोरिया यांसह आशियातील बहुतांश अर्थव्यवस्था खाडी प्रदेशावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे या देशांमध्ये महागाई आणि मंदीचा धोका वाढला आहे. युरोप आणि अमेरिकेतही महागाई नियंत्रणासाठी व्याजदर वाढवण्याची चर्चा सुरू झाली आहे. १९७० च्या दशकातील इस्रायल–इजिप्त–सीरिया युद्ध आणि इस्लामिक क्रांतीदरम्यानच्या तेलसंकटांपेक्षाही हे मोठे ऊर्जा संकट मानले जात आहे. होर्मुज जलमार्ग बंद राहिल्याने निर्माण झालेल्या आर्थिक संकटाचा परिणाम आशिया, आफ्रिका, युरोपसह अमेरिकेवरही झाला आहे. अमेरिकेत डिझेलच्या किमती सुमारे २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. डिझेल आणि खतांच्या वाढलेल्या किमतींचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू महागल्याने ट्रम्प यांच्या 'मागा' समर्थकांमध्येही नाराजी वाढत आहे. युद्धाला विरोध करणाऱ्यांचे प्रमाण ६१ टक्क्यांहून अधिक झाले असून, ट्रम्प यांचा जनाधार इतिहासातील किमान पातळीवर पोहोचला आहे. सेनेटमध्ये विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाचे सिनेटर संरक्षणमंत्री हेगसेथ आणि परराष्ट्रमंत्री रुबियो यांना समित्यांसमोर हजर करण्यावर ठाम आहेत. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या संसदीय निवडणुकांमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाने काँग्रेसमधील बहुमत गमावले, तर त्यांच्यावर महाभियोगाची तलवार लटकू शकते. त्यामुळे ते या युद्धाचा शेवट असा कोणता तरी करार करून करण्याच्या प्रयत्नात आहेत, ज्यात त्यांच्या विजयाचा दावा करता येईल. यासाठी ते विविध मध्यस्थांमार्फत संदेश पाठवून चर्चेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र चीन किंवा रशियासारखा इराणशी धोरणात्मक संबंध असलेला देश मध्यस्थीसाठी पुढे आलेला नाही. ओमान आणि कतारसारखे पारंपरिक मध्यस्थही तयार झाले नाहीत. शेवटी पाकिस्तानच एक पर्याय उरला आहे. फारसचा आखात आणि ओमानचा आखात यांना जोडणाऱ्या होर्मुज जलमार्गाची रुंदी एका ठिकाणी केवळ २१ सागरी मैल आहे. त्यातील १२ सागरी मैल इराणच्या जलसीमेत आणि १२ सागरी मैल ओमानच्या जलसीमेत येतात. या दोन्ही देशांच्या जलसीमा एकमेकांना लागून असल्या, तरी संयुक्त राष्ट्रांच्या सागरी कायद्यांनुसार ते या मार्गाने जाणाऱ्या जहाजांना अडवू शकत नाहीत. जसे विमानांना इतर देशांच्या हवाई क्षेत्रातून उड्डाण करण्याचा अधिकार असतो, तसेच जहाजांना जलसीमेतून जाण्याचा अधिकार आहे. येथे प्रश्न अधिकारांचा नसून आंतरराष्ट्रीय नियमांच्या पालनाचा आहे. इराणवर हल्ला करताना अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त राष्ट्रांच्या नियमांचे पालन केले नाही. इराणचे मित्र देश चीन आणि रशिया किंवा इतर देशांनीही हल्ले थांबवण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत. अशा परिस्थितीत आता इराणकडून होर्मुज मार्ग खुला ठेवण्याची अपेक्षा कशी करणार, हा प्रश्न उपस्थित होतो. हा मार्ग खुला करण्यासाठी ट्रम्प यांनी नाटो आणि इतर मित्रदेशांवर दबाव आणला, पण त्याचा काहीही परिणाम झाला नाही. नाटोचे महासचिव मार्क रुटे यांनी होर्मुज खुला करण्यासाठी तीस देशांचा गट तयार करण्याचा प्रस्ताव मांडला असला, तरी इराणचे म्हणणे आहे की हा मार्ग पूर्णपणे बंद नाही. त्यांच्या मित्रदेशांच्या जहाजांसाठी तो खुला आहे; फक्त अमेरिका, इस्रायल आणि त्यांच्या समर्थक देशांच्या जहाजांसाठी बंद आहे. त्यांना जाण्यासाठी मोठा कर द्यावा लागेल. पूर्वी अमेरिकेने इराणच्या सत्तेला कमकुवत करण्यासाठी त्याच्या तेलावर निर्बंध घातले होते. आता मात्र इराणनेच अमेरिकन आणि त्यांच्या मित्रदेशांच्या जहाजांवर निर्बंध लादले आहेत. हा मार्ग खुला करण्यासाठी ट्रम्प एकीकडे इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ल्याच्या धमक्या देत आहेत आणि मरीन व पॅराशूट सैनिकांची तैनाती करत आहेत, तर दुसरीकडे त्या धमक्यांची मुदत वाढवत आहेत.

# मध्यपूर्वेत भारताचा धोरणात्मक संतुलनाचा डाव

2026 च्या फेब्रुवारीच्या उत्तरार्धात अमेरिका-इराण संघर्षाची अचानक तीव्रता वाढली. अमेरिकन-इस्रायली हल्ल्यांनी इराणच्या अणुस्थळांना लक्ष्य केले आणि त्यानंतर तेहरानने गल्फमधील पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. यामुळे मध्यपूर्वेने नव्या अस्थिरतेच्या टप्प्यात प्रवेश केला आहे. तेलाचे दर वाढत आहेत, होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक वारंवार विस्कळीत होत आहे, आणि या प्रदेशाने पुन्हा एकदा जागतिक अर्थव्यवस्थेला हादरा देण्याची क्षमता दाखवली आहे. भारताचे या प्रदेशाशी ऊर्जा अवलंबित्व, मोठी परदेशी भारतीयांची संख्या आणि वाढती राजनैतिक भागीदारी असे व्यापक हितसंबंध जोडलेले आहेत. ही अस्थिरता भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या लवचिकतेची आणि सुसंगतीची कसोटी पाहते.



गेल्या काही दशकांत भारताने एक संतुलित बहुपक्षीय धोरण अवलंबले आहे. ठराविक गटांमध्ये स्वतःला मर्यादित न ठेवता, नवी दिल्लीने इराण, गल्फ देश, इस्रायल आणि अमेरिका यांच्याशी समांतर संबंध विकसित केले आहेत. हे संतुलन राखणे कठीण असल्याचे अनेकदा म्हटले गेले असले तरी, संकटकाळात त्यामागील तर्क अधिक स्पष्टपणे दिसून येतो. सध्याचा संघर्ष याला अपवाद नाही. भारताची प्रतिक्रिया संयमित आणि विचारपूर्वक राहिली आहे. ज्यामध्ये सर्व पक्षांना संयम बाळगण्याचे आवाहन करणे, आपले आर्थिक हित जपणे आणि सर्व संबंधित देशांशी संवाद सुरू ठेवणे याचा समावेश आहे. या प्रक्रियेत भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता आणि दीर्घकालीन हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

या संकटाचा आर्थिक परिणाम सर्वाधिक तातडीचा आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या सुमारे 88 टक्के गरजेसाठी आयातीवर अवलंबून आहे, आणि होर्मुझ सामुद्रधुनीत कोणताही अडथळा निर्माण झाला तर त्याचे थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतात. टँकर वाहतुकीत झालेली घट आणि वाढलेले तेल दर यामुळे भारताच्या आधीच मोठ्या असलेल्या आयात बिलात वाढ होण्याचा धोका निर्माण झाला. मात्र, अलीकडील वर्षांत विविधीकरण आणि सामरिक साठ्यांवर दिलेल्या भरामुळे काही प्रमाणात संरक्षण मिळाले आहे. सुमारे दोन महिन्यांच्या गरजा भागवू शकतील इतके साठे आणि रशिया, अमेरिका तसेच इतर स्रोतांमधून पर्यायी पुरवठा यामुळे भारताला तात्कालिक धक्का सहन करता आला आहे. या परिस्थितीतून मिळणारा मुख्य धडा असा की, ऊर्जा धोरणातील लवचिकता ही आता पर्याय नसून गरज बनली आहे, विशेषतः अशा देशासाठी ज्याची आर्थिक वाढ आयातित इंधनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या सुमारे 88 टक्के गरजेसाठी आयातीवर अवलंबून आहे, आणि होर्मुझ सामुद्रधुनीत कोणताही अडथळा निर्माण झाला तर त्याचे थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतात. टँकर वाहतुकीत झालेली घट आणि वाढलेले तेल दर यामुळे भारताच्या आधीच मोठ्या असलेल्या आयात बिलात वाढ होण्याचा धोका निर्माण झाला.

भारत-इराण आर्थिक संबंध सर्जनशील पद्धतीने टिकवून ठेवले गेले आहेत. निर्बंधांमुळे रुपया-तेल व्यवहार थांबले असले तरी, नवी दिल्लीने सवलतीच्या दरात इराणी LPG आयातीसाठी "मानवीय मार्ग" निश्चित केला आणि खत तुटवडा टाळण्यासाठी 5 लाख टन पुरवठा सुनिश्चित केला. या व्यावहारिक दृष्टिकोनामुळे भारताने इराणकडून आपल्या ऊर्जा बास्केटमधील सुमारे 5 टक्के पुरवठा कायम ठेवला, तेही कोणत्याही दंडात्मक कारवाईशिवाय. यासोबतच UAE आणि सौदी अरेबियाकडून हरित हायड्रोजन प्रकल्पांमध्ये 10 अब्ज डॉलर गुंतवणूक वाढवून, भारताने केवळ देशांतर्गत दर स्थिर ठेवले नाहीत तर स्वतःला दीर्घकालीन विश्वासार्ह भागीदार म्हणूनही सिद्ध केले.

या संकटातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गल्फ प्रदेशातील भारतीय प्रवासी समुदायाचे कल्याण. पश्चिम आशियात जवळपास 1 कोटी भारतीय राहतात आणि त्यांच्याकडून येणारी रक्कम भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधार आहे. कोणताही प्रादेशिक संघर्ष हवाई वाहतूक, आर्थिक क्रियाकलाप किंवा पायाभूत सुविधांवर परिणाम करत असल्यास या समुदायावर थेट परिणाम होतो. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने तातडीने स्थलांतर योजना आणि आपत्कालीन मदतीचे समन्वयन केले. या उपाययोजना भारताच्या या प्रदेशाशी असलेल्या संबंधांचा मानवी पैलू अधोरेखित करतात की केवळ धोरणात्मक नव्हे तर आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

या सर्व समीकरणात भारत-इराण संबंध विशेषतः संवेदनशील आहेत. पाश्चिमात्य निर्बंध आणि भू-राजकीय तणावामुळे तेहरानशी संबंध अनेकदा गुंतागुंतीचे झाले असले तरी, भारताने इराणला ऊर्जा सुरक्षेसाठी तसेच मध्य आशिया आणि अफगाणिस्तानशी जोडण्यासाठी महत्त्वाचा भागीदार मानले आहे. चाबहार बंदराचा विकास हा याच दीर्घकालीन रणनीतीचा भाग आहे. सध्याच्या संकटातही नवी दिल्लीने इराणसोबतचे सहकार्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचवेळी, UAE आणि सौदी अरेबियासारख्या गल्फ देशांशी संबंध अधिक मजबूत केले जात आहेत, ज्यांची गुंतवणूक आणि आर्थिक भूमिका वाढत आहे. या समांतर संबंधांचे व्यवस्थापन करण्यासाठी कौशल्यपूर्ण राजनय आवश्यक आहे, आणि सर्व पक्षांशी संवाद ठेवण्याची हीच क्षमता भारताला लवचिकता प्रदान करते.

रणनीतिक दृष्ट्या, या संघर्षामुळे प्रादेशिक सहभागात भारताच्या कनेक्टिव्हिटी उपक्रमांचे महत्त्वही अधोरेखित होते. आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरशी जोडलेला चाबहार प्रकल्प हा मध्य आशिया आणि इतर बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी भारतासाठी महत्त्वाचा आहे, ज्यामुळे पारंपरिक मार्गांवर अवलंबित्व कमी होते. त्याचवेळी, गल्फ देश आणि इस्रायलसोबत उदयास येणाऱ्या आर्थिक व सुरक्षा भागीदारी भारताच्या बदलत्या प्रादेशिक भूमिकेचे प्रतिबिंब आहेत. नवी दिल्लीसमोरील आव्हान म्हणजे एका गटाला प्राधान्य देणे नव्हे, तर या सर्व उपक्रमांमध्ये समन्वय साधून ते एकमेकांना पूरक ठरतील याची खात्री करणे.

भारताने राजनैतिक पातळीवर सावध तटस्थतेचा मार्ग अवलंबला आहे. नवी दिल्लीने संयम, संवाद आणि तणाव वाढू न देण्यावर भर दिला आहे. अशा भूमिकेमुळे भारत सर्व पक्षांशी संबंध टिकवून ठेवू शकतो आणि कोणत्याही एका गटाशी संलग्न असल्याचा आभास टाळू शकतो. ज्या प्रदेशात स्पर्धा आणि संघर्ष खोलवर रुजलेले आहेत, तेथे अशी संतुलित भूमिका भारताची विश्वासार्हता वाढवते.

या परिस्थितीतून स्पष्ट होते की भारताचे मध्यपूर्व धोरण अधिक परिपक्व होत आहे. हा प्रदेश आता केवळ ऊर्जा आयातीपुरता मर्यादित न राहता आर्थिक, राजकीय आणि सुरक्षा हितसंबंधांच्या संगमाचे एक गुंतागुंतीचे क्षेत्र म्हणून पाहिला जात आहे. सध्याचे संकट विविध भागीदारी आणि लवचिक राजनय यांचे महत्त्व अधोरेखित करते. वाढत्या भू-राजकीय स्पर्धेच्या काळात कठोर गटबांधणी भारतासारख्या देशासाठी मर्यादित फायदेच देऊ शकते.

अखेर, अमेरिका-इराण संघर्ष पुन्हा एकदा मध्यपूर्वेतील अस्थिरतेची आठवण करून देतो. भारतासाठी आव्हान हे अशा अस्थिरतेपासून दूर राहणे नसून त्याचे सुज्ञपणे आणि स्पष्ट रणनीतीने व्यवस्थापन करणे आहे. नवी दिल्लीची आतापर्यंतची भूमिका दर्शवते की आजच्या जगात प्रभाव हा एखाद्या बाजूची निवड करण्यापेक्षा सर्वांशी संवाद ठेवण्याच्या क्षमतेतून येतो. त्या अर्थाने, भारताचे संतुलित धोरण हे संकोचाचे नव्हे, तर रणनीतिक परिपक्वतेचे प्रतीक आहे. आव्हाने नक्कीच आहेत, पण उदयोन्मुख शक्ती म्हणून भारतासाठी संतुलन ही केवळ टिकून राहण्याची गरज नाही तर तो प्रभाव निर्माण करण्याचा गाभा आहे.

# होर्मुझ तणावाचा जागतिक फटका तेल, खतं आणि अन्नसुरक्षा धोक्यात!




अमेरिका आणि इस्रायल तसेच इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे महत्त्वाच्या सागरी मार्गांवर पुन्हा तणाव वाढला आहे आणि त्यामुळे जागतिक पुरवठा साखळ्यांवर दबाव निर्माण झाला आहे. आखाती प्रदेश आणि जागतिक अर्थव्यवस्था यांना जोडणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे तेल, द्रवीभूत नैसर्गिक वायू आणि खतांच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. UNCTAD च्या माहितीनुसार जगातील सुमारे 38 टक्के कच्चे तेल, 13 टक्के रसायने जसे खत आणि 2.4 टक्के कोरडा माल या मार्गाने वाहतूक केला जातो. नैसर्गिक वायूच्या किमती वाढल्यामुळे नायट्रोजनयुक्त खतांच्या किमतीही वाढल्या आहेत. त्यामुळे सुदान, सोमालिया, टांझानिया आणि मोजांबिकसारख्या गरीब देशांसाठी खतांची उपलब्धता अधिक कठीण झाली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार आशिया अजूनही आखाती प्रदेशातून येणाऱ्या खतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे, त्यामुळे भविष्यात कृषी उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. युरिया आणि डाय अमोनियम फॉस्फेट यांचा जगातील सर्वात मोठा आयातदार असलेला भारत आधीच इंडोनेशिया, बेलारूस, रशिया आणि चीन यांसारख्या देशांकडून खरेदी वाढवून विविधीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. इनपुट खर्च वाढल्यामुळे शेतीचा खर्च वाढतो आहे आणि अन्न उत्पादनात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर अन्नमहागाई वाढू शकते. जर हा संघर्ष आणखी वाढला तर जागतिक अन्न पुरवठा साखळी आणि पश्चिम आशियातील पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे अन्न आणि पाणी सुरक्षिततेचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

आखाती प्रदेश आणि जागतिक अर्थव्यवस्थेला जोडणाऱ्या महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्यामुळे जागतिक तेल, द्रवीभूत नैसर्गिक वायू आणि खतांच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे मध्यपूर्वेतील अन्न आयातीवर आणि एकाच व्यापार मार्गांवर असलेल्या अवलंबित्वाची कमकुवतता स्पष्ट झाली आहे. पूर्वीच्या जागतिक संकटांमधून शिकून देशांनी अन्नसाठा वाढवणे आणि व्यापार मार्ग विविध करणे यासाठी प्रयत्न केले असले तरी, हे उपाय वाढत्या वाहतूक अडचणींपासून पूर्णपणे सुरक्षित नाहीत. GCC देशांनी सुमारे सहा महिन्यांच्या संकटाचा सामना करता यावा म्हणून अन्नसाठे तयार केले असल्याचे सांगितले जाते. मात्र सर्व GCC देशांना पर्यायी सागरी मार्गांचा भौगोलिक फायदा मिळत नाही. सौदी अरेबियाला लाल समुद्राचा आणि ओमानला अरबी समुद्रावरील बंदरांचा प्रवेश असल्यामुळे त्यांना काही प्रमाणात मदत मिळते. पण इतर देशांना सौदी अरेबिया किंवा ओमानमार्गे माल पुन्हा पाठवण्यावर अवलंबून राहावे लागते. GCC देश पर्यायी समुद्र आणि रस्ता मार्ग विकसित करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण हे पर्याय दीर्घकाळ टिकाऊ नाहीत कारण संपूर्ण व्यापार त्यावर वळवणे शक्य नाही आणि आधीच काही अडचणी दिसत आहेत. जर अन्न आयात केप ऑफ गुड होपमार्गे वळवावी लागली तर इंधन आणि वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढतो, आणि त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमती वाढण्यात होतो.

पाणी हा आणखी एक गंभीर प्रश्न बनत आहे, जो भौतिक पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांमुळे तसेच अन्न व्यापाराच्या पद्धतींमधून अप्रत्यक्षपणे समोर येत आहे. बहरीन आणि इराणमधील क्षारीकरण प्रकल्पांवरील अलीकडील हल्ल्यांमुळे अत्यंत केंद्रीकृत जलव्यवस्थापन आणि वितरण प्रणालींच्या टिकाऊपणावर प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः GCC देश त्यांच्या गोड्या पाण्याच्या गरजांपैकी सुमारे 90 टक्के भाग या प्रक्रियेवर अवलंबून असल्यामुळे ही चिंता अधिक गंभीर आहे. थेट लष्करी हल्ल्यांव्यतिरिक्त व्हर्च्युअल वॉटर आयातीचे दीर्घकालीन परिणामही महत्त्वाचे ठरत आहेत. पाणीटंचाई असलेल्या या प्रदेशात मांस आणि धान्यांसारख्या पाणीआधारित उत्पादनांसाठी ब्राझील आणि भारतासारख्या पाण्याने समृद्ध देशांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते. जर हा संघर्ष वाढून जागतिक पीक हंगामावर परिणाम झाला, तर आखाती देशांना काही काळासाठी आपल्या पाणी वापराच्या क्षमतेत घट अनुभवावी लागू शकते. वाढत्या खतांच्या किमती आणि हवामान बदलाचे परिणाम यामुळे पीक उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे, आणि त्यामुळे रशिया युक्रेन युद्धाच्या वेळी जसे झाले तसे अन्न निर्यात थांबवण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो.

या संघर्षामुळे मध्यपूर्व, उत्तर आफ्रिका आणि दक्षिण आशिया (MENASA) क्षेत्रातील शेजारील देशांच्या अन्नसुरक्षेवर दूरगामी पडसाद उमटण्याचा धोका आहे. जर आखाती देशांनी मोरोक्को, इजिप्त, सुदान आणि जॉर्डन यांसारख्या 'मेना' (MENA) देशांमधून आपली शेतमालाची आयात वाढवण्याचा निर्णय घेतला, तर त्यामुळे या देशांमधील देशांतर्गत अन्नधान्य महागाई अधिक वाढेल. परिणामी, रशिया-युक्रेन युद्ध आणि कोविड-19 महामारीमुळे अगोदरच वाढलेली महागाईची पातळी आणखी तीव्र होईल. याव्यतिरिक्त, आखाती देशांमध्ये भारत, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील लाखो प्रवासी कामगार वास्तव्यास आहेत. या देशांच्या राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) या कामगारांनी मायदेशी पाठवलेल्या पैशांचा (Remittances) वाटा 3.4 ते 9.4 टक्क्यांच्या घरात आहे. इजिप्त, येमेन आणि सुदानच्या नागरिकांनाही याचा मोठा फटका बसेल, कारण त्यांच्या 'जीडीपी'मध्ये या रेमिटन्सचा वाटा 7.6 ते 15 टक्क्यांपर्यंत आहे. आखातातील कामगारांच्या कमाईतील अनिश्चितता किंवा नवीन रोजगार करार मिळवण्यात येणाऱ्या अडचणींमुळे त्यांच्या मायदेशी पाठवल्या जाणाऱ्या उत्पन्नात घट होऊ शकते. याचा थेट परिणाम त्यांच्या कुटुंबांच्या अन्नसुरक्षेवर होऊन त्यांच्यासमोरील संकट अधिक गडद होऊ शकते.

अन्न आणि ऊर्जा पुरवठा साखळ्या एकमेकांशी जोडलेल्या असल्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे ऊर्जा पुरवठ्यात अडथळे आल्याने कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या, खतांची कमतरता निर्माण झाली आणि वाहतूक खर्च वाढले, त्यामुळे महागाई वाढून अन्नकिमती वाढल्या आहेत.

पश्चिम आशियातील संघर्षाचा जागतिक अन्न आणि कृषी पुरवठा साखळ्यांवर मोठा परिणाम होत आहे. ऊर्जा आणि अन्न या साखळ्या घट्टपणे जोडलेल्या असल्यामुळे ऊर्जा पुरवठ्यात अडथळे आल्याने तेलाच्या किमती वाढल्या, खतांची उपलब्धता कमी झाली आणि वाहतूक खर्च वाढले. यामुळे किरकोळ अन्नकिमती वाढल्या आहेत. खतांच्या वाढत्या किमतींमुळे शेतकऱ्यांवर परिणाम होऊ शकतो, कारण कमी नफा असल्यामुळे ते कमी इनपुट लागणाऱ्या पिकांकडे वळू शकतात. या परिस्थितीमुळे अनेक देशांमधील कृषी निर्यातीचे करारही रद्द झाले आहेत. वाढलेल्या वाहतूक खर्चामुळे सुमारे 400000 मेट्रिक टन भारतीय बासमती तांदूळ बंदरांवर अडकून पडला आहे, ज्याचा परिणाम सौदी अरेबिया, इराण, इराक, संयुक्त अरब अमिराती आणि येमेन यांसारख्या आयातदार देशांवर झाला आहे. याशिवाय भारतातून निर्यात होणाऱ्या कांदे, केळी आणि द्राक्षे यांसारख्या नाशवंत वस्तूंचे सुमारे 200 कंटेनर बंदरे आणि साठवण ठिकाणी अडकून पडले आहेत आणि त्यांचे पुढे काय होईल हे निश्चित नाही. त्याचप्रमाणे या संघर्षामुळे वाढलेल्या तेलकिमतींमुळे ब्राझीलमध्ये इथेनॉल आणि साखरेच्या मागणीवर परिणाम झाला आहे आणि त्यामुळे अन्नपदार्थांच्या किमती वाढल्या आहेत. वाढलेल्या वाहतूक खर्चामुळे जागतिक धान्यकिमती वाढण्याची आणि उपलब्धता कमी होण्याची शक्यता आहे, कारण ब्राझील हा मका आणि सोयाबीनचा मोठा पुरवठादार आहे. श्रीलंकेच्या चहा उद्योगावरही या संघर्षाचा परिणाम झाला असून आखाती प्रदेशात जाणाऱ्या सीलोन टीच्या वाहतुकीत अडथळे आल्यामुळे शेतकऱ्यांना कमी दर मिळत आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये तेलकिमती वाढल्यामुळे अन्नटंचाईची चिंता निर्माण झाली आहे, कारण देशभर अन्न वाहतूक करणे कठीण होत आहे. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जशी राशनिंग व्यवस्था होती तशी परिस्थिती पुन्हा निर्माण होण्याची शक्यता आहे.

पश्चिम आशियासाठी जागतिक अन्नपुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे धान्य, खाद्यतेल आणि कडधान्यांसाठी अनेक स्रोतांमधून खरेदी करण्याची गरज स्पष्ट होते. यासाठी दक्षिण आशिया, युरोप, पूर्व आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या भागांमध्ये पुरवठा साखळ्या मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच अंतर्गत वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी आणि विशेष अन्न कॉरिडॉर तयार करण्यासाठी गुंतवणूक केल्यास पर्यायी बंदरांशी संपर्क वाढू शकतो. जागतिक स्तरावर अन्नसुरक्षेला प्राधान्य देणारे व्यापार करार वाढवणे गरजेचे आहे, ज्यामुळे अन्नमहागाई कमी होईल आणि शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ मिळेल. WTO च्या अन्न व्यापार चर्चेमध्ये अन्नाचा व्यापार ही एक नैतिक जबाबदारी आहे, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे, ज्यामुळे बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित होते. अन्न क्षेत्रातील व्यापार सुलभीकरणामुळे शुल्कवाढ, निर्यातबंदी आणि गुणवत्ता व सुरक्षा नियमांशी संबंधित अडचणी कमी करता येऊ शकतात, विशेषतः संकटकाळात. याशिवाय FAO ने फूड इम्पोर्ट फायनान्सिंग फॅसिलिटीचा प्रस्ताव दिला आहे, ज्यामुळे अन्न आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना आर्थिक मदत मिळू शकते आणि त्यांना आवश्यक अन्न आयात सुरू ठेवता येईल.

कमोडिटी बाजारपेठा शेतकरी आणि आयातदारांसाठी जोखीम कमी करण्यास मदत करू शकतात, कारण त्या माहितीची पारदर्शकता वाढवतात आणि अचानक होणारी विक्री टाळण्यास मदत करतात. रासायनिक खतांवरील अवलंबित्व लक्षात घेता हवामानानुकूल शेती पद्धतींचा वापर वाढवणे आवश्यक आहे. पोषकतत्त्व व्यवस्थापन, पुनरुत्पादक शेती, जैवखते आणि अचूक शेती यांसारख्या उपायांमुळे दीर्घकालीन पातळीवर रासायनिक खतांची गरज कमी होऊ शकते. तसेच साठवण सुविधा, डिजिटल लॉजिस्टिक्स, गोदामे आणि शीतसाखळी यांसारख्या पुरवठा साखळी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्यास भू-राजकीय धक्क्यांचा परिणाम कमी करता येतो, कारण यामुळे वस्तू जास्त काळ टिकतात आणि त्यांचा मागोवा व मागणीचा अंदाज अधिक अचूकपणे घेता येतो.

# अयोध्येची प्रगत नगररचना आणि समृद्ध वारसा हेच भारताच्या प्रगतीचे अधिष्ठान:- पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी

**नालासोपारा:**

"भारतीय संस्कृती ही केवळ पोथीपुराणांची संस्कृती नसून ती अत्यंत प्रगत विज्ञान, तंत्रज्ञान आणि आदर्श जीवनपद्धतीचा वारसा सांगणारी संस्कृती आहे. प्रभू रामचंद्र हे केवळ उपासनेचे दैवत नसून ते संपूर्ण विश्वासाठी एक 'आदर्श पुरुष' आहेत, ज्यांनी अयोध्येतून देशाला जगण्याची नवी दिशा दिली," असे प्रतिपादन प. पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांनी दिनांक २६ मार्च रोजी रामनवमीच्या सत्संग सोहळ्यात केले.

काडसिद्धेश्वर गुरुभक्त मंडळ (मीरा-भाईंदर ते विरार विभाग) यांच्या वतीने कालीमाता मंदिर नालासोपारा येथे आयोजित 'वार्षिक सत्संग सोहळ्यात' स्वामीजी बोलत होते. यावेळी त्यांनी रामायणातील संदर्भासह अयोध्येच्या ऐतिहासिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक वैभवाचा उलगडा केला.

आजपासून सुमारे १०,००० वर्षांपूर्वी अयोध्या हे केवळ एक शहर नसून भारताची 'सांस्कृतिक राजधानी' होती. ज्याप्रमाणे काशी-मथुरा ही आध्यात्मिक ज्ञानाची शिखरे आहेत आणि महाराष्ट्रात पंढरपूर हे भक्तीचे केंद्र आहे, त्याचप्रमाणे अयोध्येने भारताच्या सांस्कृतिक परंपरेला जिवंत ठेवले आहे. शरयू नदीच्या तीरावर वसलेला हा 'अवध प्रांत' इक्ष्वाकु वंशातील राजा अंबरीश, राजा अज आणि राजा दशरथ यांसारख्या तेजस्वी राजांच्या पराक्रमाने पावन झाला आहे.

प्राचीन भारतातील प्रगत नगररचना आणि विज्ञान ऋषी वाल्मिकींनी रामायणात केलेल्या अयोध्येच्या वर्णनाचा दाखला देत स्वामीजींनी तत्कालीन प्रगत तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. १०,००० वर्षांपूर्वी भारतात 'नगररचना शास्त्र' किती प्रगत होते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे अयोध्या. शहराचा विस्तार प्रचंड असूनही त्याची रचना अत्यंत सुरक्षित आणि आधुनिक होती.

त्याकाळी भारतीयांना लोखंड शुद्ध करण्याची प्रक्रिया, सोने-चांदी गाळणे आणि त्यापासून कलाकुसरीचे अलंकार बनवण्याचे अचूक ज्ञान होते. लाकडापासून टिकाऊ वस्तू बनवण्याची 'काष्ठकला' देखील अत्युच्च शिखरावर होती. जेव्हा जगातील अनेक देशांना "कपडे कसे नेसावे" याचेही ज्ञान नव्हते, तेव्हा अयोध्येत अत्यंत उच्च दर्जाची वस्त्रे विणली जात होती.

स्वामीजींनी अयोध्येतील वाड्यांचे वर्णन करताना सांगितले की, तेथील घरांमध्ये अशा प्रकारे हिरे किंवा स्फटिक बसवलेले असायचे की, सूर्याचा प्रकाश त्यावर पडल्यानंतर त्याचे परावर्तन होऊन पूर्ण घर उजळून निघत असे. हे त्या काळच्या सौर ऊर्जेचा आणि प्रकाश विज्ञानाचा केलेला कल्पक वापर होता. संरक्षणाच्या दृष्टीने अयोध्या अभेद्य होती. शहराच्या तटबंदीवर 'शतघ्नी' (तोफा) तैनात होत्या, ज्या एकाच वेळी शेकडो शत्रूंना नष्ट करण्याची क्षमता ठेवत. यावरून त्याकाळी भारतीयांना दारूगोळा आणि क्षेपणास्त्र शास्त्राचे ज्ञान होते हे सिद्ध होते.

भारतीय संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच सन्मानाचे स्थान राहिले आहे, हे अधोरेखित करताना स्वामीजी म्हणाले, अयोध्येत त्या काळी 'महिलांची नाट्यमंडळे' होती.. स्त्रिया केवळ नाटकात भाग घेत नव्हत्या, तर पुरुषांच्या भूमिकाही समर्थपणे साकारत असत. 'चूल आणि मूल' ही संकल्पना भारताची नसून, आम्ही स्त्रियांना सुरुवातीपासूनच कलेचे आणि अभिव्यक्तीचे व्यासपीठ दिले आहे.

अयोध्येच्या सैन्यात पायदळ, अश्वदळ, हस्तिदळ आणि रथदळ अशी चतुरंग सेना होती. केवळ युद्धच नव्हे, तर दैनंदिन गरजांसाठी देखील तंत्रज्ञान वापरले जात असे. समुद्र नसतानाही माती आणि झाडांच्या पाल्यापासून मीठ तयार करण्याची विद्या भारतीयांना अवगत होती. तसेच, 'वेस्ट मॅनेजमेंट' (कचरा व्यवस्थापन) ही संकल्पना राबवून विविध टाकाऊ पदार्थांपासून उपयुक्त वस्तू आणि खते बनवण्याचे कौशल्य लोकांकडे होते.

अयोध्या ही केवळ एक धार्मिक नगरी नसून ती विज्ञान, कला, शौर्य आणि प्रगत विचारांची जननी आहे. आपण आपले हे गौरवशाली प्राचीन ज्ञान विसरता कामा नये. या महान वारशापासून प्रेरणा घेऊन आपण पुन्हा देशाला समृद्ध आणि सामर्थ्यवान बनवण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे. भारतीय संस्कृती ही केवळ तत्त्वज्ञानाची नव्हे, तर प्रगत विज्ञानाची आणि सूक्ष्म निरीक्षणाची जननी आहे. आपल्या पूर्वजांना निसर्गातील अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या घटकांचेही महत्त्व ठाऊक होते. हेच ज्ञान आणि सामाजिक न्यायाची जोड म्हणजे 'रामराज्य' होय.

स्वामीजींनी आपल्या प्रवचनातून भारतीय परंपरेतील विज्ञानाचे आणि रामराज्याच्या खऱ्या व्याख्येचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले. स्वामीजींनी सांगितले की, प्राचीन काळी भारतीयांना निसर्गातील प्रत्येक जिवाच्या उपयोगाचे सखोल ज्ञान होते. ज्याला आज आपण 'वेस्ट मॅनेजमेंट' म्हणतो, त्याचे तंत्र आपल्या पूर्वजांना हजारो वर्षांपूर्वी अवगत होते. गाढवाच्या विष्ठेपासून कागद बनवण्याचे तंत्र असो किंवा मातीची भांडी मजबूत करण्यासाठी मातीमध्ये घोड्याच्या लिंडीचा वापर असो; आपल्या पूर्वजांनी प्रत्येक नैसर्गिक घटकाचा वैज्ञानिक वापर शोधला होता. अगदी उंदीर आणि पाल यांच्या विष्ठेतील औषधी गुणधर्मांचाही अभ्यास आपल्या शास्त्रात होता.

मक्षिका विष्ठा आणि 'अमृताचा' अंशः स्वामीजींनी घरगुती माश्यांचे एक विलोभनीय उदाहरण दिले. पूर्वीच्या काळी घरांमध्ये दोऱ्याला गोड रस लावून माश्यांच्या विष्ठेचा संग्रह केला जात असे. या विष्ठेचा अत्यंत सूक्ष्म अंश लहान बाळाला लावल्यास त्याला शांत झोप लागत असे. हे त्या काळातील 'नैसर्गिक औषधशास्त्राचे' एक उत्तम उदाहरण होते. "आपल्या लोकांचे तंत्र आणि मंत्र त्याकाळी खरोखरच अचाट होते," असे स्वामीजींनी नमूद केले.

आज प्रत्येकजण 'रामराज्य' यावे अशी इच्छा व्यक्त करतो, पण रामराज्याचा नेमका अर्थ काय? यावर स्वामीजींनी वाल्मिकी रामायणातील संदर्भासह प्रकाश टाकला. अयोध्या महाराज दशरथांच्या काळातही वैभवशाली होती. पण केवळ परंपरेने मिळालेले वैभव टिकवणे म्हणजे रामराज्य नव्हे. रामराज्याचे सर्वात महत्त्वाचे लक्षण म्हणजे- ज्या राज्यात विधवा स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे कष्ट सोसावे लागत नाहीत. ज्या समाजात निराधार, अनाथ आणि विधवा स्त्रिया पूर्णपणे सुरक्षित आहेत, ज्यांना कोणासमोरही हात पसरण्याची वेळ येत नाही, तेच खरे 'रामराज्य'! सामाजिक न्याय आणि दुर्बलांचे रक्षण हाच रामराज्याचा खरा आत्मा आहे.

स्वामीजींच्या या मार्गदर्शनातून हे स्पष्ट होते की, भारताचा प्राचीन वारसा हा केवळ पूजेपुरता मर्यादित नसून तो वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारलेला आहे. निसर्गातील लहानात लहान घटकाचा मानवी कल्याणासाठी वापर करणे आणि समाजातील शेवटच्या घटकाला (विशेषतः स्त्रियांना) सन्मानाने जगू देणे, हीच प्रभू रामचंद्रांनी घालून दिलेली खरी आदर्श जीवनपद्धती आहे. आपल्या गौरवशाली इतिहासातील हे विज्ञान आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करणे हीच आजच्या काळातील खरी गरज आहे.

रामराज्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तेथील महिलांची सुरक्षितता. प्रभू रामचंद्रांच्या राज्यात अकाली मृत्यूचे प्रमाण नगण्य होते, त्यामुळे विधवांची संख्या अत्यंत कमी होती. हे त्या काळातील प्रगत जीवनशैलीचे लक्षण होते. जरी एखादी महिला विधवा झाली, तरी तिला समाजात 'विधवा' म्हणून हिणवले जात नसे. संपूर्ण समाज तिच्याशी आत्मीयतेने आणि आदराने वागत असे. ज्या निराधार महिलांना पती किंवा अपत्ये नसत, त्यांच्या पालणपोषणाची आणि आनंदाची संपूर्ण जबाबदारी राज्याची आणि समाजाची होती. त्यांना कधीही कष्टाला सामोरे जावे लागत नसे.

आजच्या काळातील वृद्धाश्रमांच्या समस्येवर भाष्य करताना स्वामीजींनी रामराज्यातील कौटुंबिक शिस्तीचे उदाहरण दिले- रामराज्यात आपल्या वृद्ध माता-पित्यांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांसाठी अत्यंत कठोर दंडात्मक शिक्षेची तरतूद होती. या नियमांमुळे आणि संस्कारांमुळे वृद्ध आई-वडिलांना कधीही उपेक्षित जीवन जगावे लागत नसे. प्रत्येक घरात वृद्धांचा सन्मान हा देवपूजेइतकाच महत्त्वाचा मानला जाई.

रामराज्यात कोणाचाही अकाली मृत्यू होत नसे, हे विधान केवळ चमत्कार नसून ती एक वैज्ञानिक जीवनपद्धती होती, असे स्वामीजींनी स्पष्ट केले. लोक आजार होऊच नयेत यासाठी आहार, व्यायाम आणि इंद्रिय निग्रहाचे (संयम) पालन करत असत. समाजात कोणत्याही प्रकारचे व्यसन नव्हते, ज्यामुळे लोकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम असे. अतिश्रम टाळून सुवर्णमध्य साधणारी जीवनपद्धती तिथे अस्तित्वात होती.

स्वामीजींनी रामराज्यातील कौटुंबिक एकतेचे महत्त्व सांगताना 'द्वेषमुक्त' समाजाचे दर्शन घडवले. जिथे स्वार्थ आणि मोह वाढतो, तिथे कुटुंबे तुटतात. रामराज्यात लोक वैयक्तिक हितापेक्षा कौटुंबिक आणि सामाजिक हिताला प्राधान्य देत असत. एकमेकांबद्दलचे प्रेम, आदर आणि परस्पर सहकार्य यामुळे तिथे मोठ्या प्रमाणावर अविभक्त कुटुंब पद्धती सुखाने नांदत होती. समाजात कोणाहीबद्दल द्वेषाची भावना नव्हती. जर आपल्याला पुन्हा खऱ्या अर्थाने 'रामराज्य' अनुभवायचे असेल, तर त्याची सुरुवात आपल्या घरापासून करावी लागेल. आपल्या कुटुंबात एकमेकांविषयी प्रेम निर्माण करणे, आरोग्याप्रती जागरूक राहणे आणि वडीलधाऱ्यांचा आदर करणे, हीच रामराज्याची पहिली पायरी आहे.

स्वामीजींनी सांगितले की, रामराज्यात कुटुंबाचा पाया 'आदर' हा होता. त्या काळी लोक एकमेकांची निंदा करत नसत. कोणाचे काही हिरावून घेण्याची वृत्ती तिथे औषधालाही नव्हती. प्रत्येकाला दुसऱ्याच्या हक्कांची जाणीव होती. घरात दहा महिला असल्या तरी त्या कधीही एकमेकींची तक्रार करत नसत. पुरुष स्त्रियांचा आदर करत आणि तरुण पिढी वृद्धांची थट्टा करण्याऐवजी त्यांचा सन्मान राखत असे. प्रत्येक नात्यात एक पवित्र 'मर्यादा' आणि निखळ 'प्रेम' होते.

रामराज्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिथे चोरी होण्याचे नावही नव्हते. स्वामीजींनी चोरीची व्याप्ती स्पष्ट करताना सांगितले की, केवळ वस्तू चोरणे म्हणजे चोरी नव्हे, तर जनावरांची चोरी, जमीन हडपणे किंवा दुसऱ्याच्या वस्तू न सांगता उचलणे या सर्व गोष्टी रामराज्यात निषिद्ध होत्या. दुसऱ्याचे विचार स्वतःच्या नावाने सांगणे, ही सुद्धा एक चोरीच आहे, असे स्वामीजींनी नमूद केले. रावणानं सीता मातेचं अपहरण केलं होतं, पण तो अयोध्येच्या सीमेबाहेरील (लंकेचा) होता. अयोध्येच्या हद्दीत अशा नीच कृत्याला थारा नव्हता. रामराज्यात मानवाचा स्वभाव जितका शिस्तबद्ध होता, तितकाच निसर्गही संतुलित होता. तिथे पाऊस अगदी वेळेवर पडत असे. तो कधीही अति (अतिवृष्टी) किंवा कमी (दुष्काळ) नसे. निसर्गाचे हे चक्र मानवाच्या सात्त्विक आचरणामुळे संतुलित होते.

जंगलातील वृक्षसंपदा विज्ञानाशी जोडलेली होती. वृक्षांच्या पानांवरील 'शिलिंद्र' उन्हाळ्याच्या काळात आकाशाकडे प्रयाण करून समुद्राकडून येणाऱ्या ढगांचे विघटन करत असत, ज्यामुळे योग्य वेळी पाऊस पडण्यास मदत होत असे. त्या काळात अतिवृष्टी, चक्रीवादळ किंवा सुनामी यांसारख्या नैसर्गिक संकटांची भीती नव्हती, कारण निसर्ग आणि मनुष्य यांच्यात एक अनोखे नाते होते. रामराज्य हे केवळ इतिहासातील पान नाही, तर ती एक अशी प्रेरणा आहे जिची आजच्या युगात नितांत गरज आहे. जर आपण आपल्या मनातून द्वेष आणि स्वार्थ काढून टाकला आणि निसर्गाचा आदर केला, तर आपण आजही रामराज्याचा अनुभव घेऊ शकतो.

स्वामीजींनी स्पष्ट केले की, अयोध्येचे तत्कालीन 'बजेट' किंवा विकास आराखडा केवळ माणसांसाठी नव्हता. झाडांपासून ते अगदी डोळ्यांना न दिसणाऱ्या अणुजीवांपर्यंत सर्वांच्या संरक्षणाची खात्री होती. पशु-पक्षी आणि वन्यप्राण्यांना मानवाप्रमाणेच सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त होता. या संतुलित नियोजनामुळेच निसर्गचक्र सुरळीत राहून वेळेवर पर्जन्यवृष्टी होत असे.

रामराज्यात हिंस्र प्राणी कधीही मानवी वस्तीत येत नसत," असे सांगताना स्वामीजींनी त्यामागचे वैज्ञानिक कारण स्पष्ट केले. ते म्हणाले, "प्रभु रामाने प्राण्यांवर कोणताही मंत्र-तंत्र केला नव्हता, तर अयोध्येच्या सभोवतालची जंगले इतकी समृद्ध आणि फळाफुलांनी नटलेली होती की, प्राण्यांना अन्नासाठी मानवी वस्तीत येण्याची गरजच पडत नव्हती. त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासातच मुबलक शिकार आणि खाद्य उपलब्ध होते.

आजच्या परिस्थितीवर खेद व्यक्त करताना स्वामीजी म्हणाले, "आज बिबट्या शहरात येतोय, हत्ती-डुकरे पिकांचे नुकसान करत आहेत. आपण स्वतःला प्रगत म्हणतो, अन्नधान्यात आणि दुध उत्पादनात जगात अग्रेसर आहोत, तरीही वन्यजीव आपल्या वस्तीत का येत आहेत? कारण आपले आजचे नियोजन 'रामराज्य' नसून केवळ 'स्वार्थी मनुष्यकेंद्रित' राज्य आहे. आपण प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट केले, त्यामुळेच आज मानव-प्राणी संघर्ष वाढला आहे.

रामराज्यातील निसर्गाचे वर्णन करताना स्वामीजींनी जैवविविधतेचे महत्त्व पटवून दिले:- तिथल्या जंगलात ऋतूंनुसार विविध प्रकारची फळे बाराही महिने उपलब्ध असायची. हिवाळ्यातही फुलणारी झाडे तिथे लावली गेली होती. निसर्गातील विविधतेचे जतन केल्यामुळे कोणत्याही ऋतूत अन्नसाखळी खंडित होत नसे. वेगवेगळ्या काळात पानगळ होणाऱ्या झाडांच्या नियोजनामुळे सृष्टी कधीही ओसाड पडत नव्हती.

स्वामीजींनी अत्यंत मार्मिक शब्दांत सांगितले की, "जर मोरांसारखे पक्षी आज शेतात आले तर आपण त्यांना हाकलतो किंवा मारतो, कारण आपल्याला फक्त स्वतःच्या पिकाची काळजी आहे. पण खऱ्या रामराज्यात मोर हे सौंदर्याचे प्रतीक म्हणून जंगलात आनंदाने वावरत होते." खरे रामराज्य तेच आहे जिथे सृष्टीतील प्रत्येक घटकाचा - मग तो माणूस असो, प्राणी असो वा वनस्पती - सर्वांचा सन्मानाने जगण्याचा विचार केला जातो. निसर्गाशी कृतज्ञ राहूनच आपण पुन्हा त्या वैभवशाली अयोध्येची निर्मिती करू शकतो. रामराज्य म्हणजे केवळ एका राजाची सत्ता नव्हे, तर ती एक आदर्श समाजव्यवस्था आहे. जिथे कायदा दुय्यम आणि 'संस्कार' श्रेष्ठ असतात, जिथे रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेमाचे नाते वरचढ असते, तेच खरे रामराज्य ! आज आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कायदे करावे लागतात, पण अयोध्येत निसर्ग स्वतःहून मानवावर भरभरून प्रेम करत असे. याचे कारण तिथला माणूस निसर्गाचा मालक नव्हे, तर 'रक्षक' होता. मानवाच्या सात्त्विक आचरणामुळेच निसर्गचक्र तिथे सदैव अनुकूल असायचे.

आजच्या समाजातील वाढत्या वादांवर भाष्य करताना स्वामीजींनी एक मोलाचा सिद्धांत मांडला. ते म्हणाले, "भांडणे मिटवण्यासाठी दोन मार्ग असतात - एक म्हणजे 'कठोर कायदा' आणि दुसरा म्हणजे 'उत्तम संस्कार'. कायद्याच्या भीतीने माणूस गुन्हा करणे टाळतो, पण संस्कारांमुळे माणूस गुन्ह्याचा विचारही करत नाही. रामराज्यात लोक कायद्यापेक्षा परस्परांवरील प्रेमामुळे आणि आदरयुक्त संस्कारांमुळे एकत्र गुण्यागोविंदाने राहत होते. जिथे प्रेम असते, तिथे संघर्षाला जागाच उरत नाही.

राजा दशरथांनी अयोध्येचा पाया भक्कम रचला होता, पण प्रभू श्रीरामांनी त्यावर संस्कारांचे भव्य गोपूर उभे केले. आपल्या पूर्वजांनी जे चांगले उभे केले आहे, त्यात पुढच्या पिढीने अधिक सकारात्मक भर टाकली पाहिजे. ज्या घरात मुले केवळ संपत्ती नव्हे तर 'संस्कृती' जपतात, तिथेच रामराज्याचा उदय होतो. अयोध्येतील प्रत्येक घरात मुलांवर असेच संस्कार केले जात होते.

स्वामीजींनी रामावरील प्रजेच्या प्रेमाचे वर्णन करताना एक भावूक कथा सांगितली. "जेव्हा राम वनवासाला निघाले, तेव्हा संपूर्ण अयोध्या शोकाकुल होती. त्याच वेळी एका घरात लग्नानंतर १५ वर्षांनी पुत्ररत्न प्राप्त झाले. अशा वेळी आनंदाऐवजी त्या माऊलीच्या डोळ्यात पाणी होते. ती म्हणाली, 'आज माझ्या घरी बाळ आले, पण माझा राजा (राम) आम्हाला सोडून चालला आहे. हे बाळ नाही, तर जणू माझ्या घराचे दारिद्र्य आहे!' स्वतःच्या १५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या मुलापेक्षाही ज्यांचे प्रेम रामावर जास्त होते, ती अयोध्या होती. हे प्रेम एकतर्फी नव्हते; श्रीरामांनी प्रत्येक अयोध्येवासीयाशी प्रेमाचे व्यक्तिगत नाते जोडले होते.

आजच्या काळात भावाभावांमधील वादावर स्वामीजींनी रामायणातील 'त्याग' संस्कृतीचा दाखला दिला. वडिलांच्या शब्दासाठी राज्याचा त्याग करणारा राम ! मोठ्या भावाच्या हक्कासाठी सिंहासनाचा त्याग करणारा भरत ! भावाच्या सेवेसाठी संसाराचा त्याग करणारा लक्ष्मण ! आजच्या युगात आपण 'आधी मी' म्हणतो, म्हणून संघर्ष होतो. जर आपण 'आधी तू' ही वृत्ती जोपासली, तर जगातील कोणताही संघर्ष टिकणार नाही," असे स्वामीजींनी ठामपणे सांगितले. आपल्या घरात प्रभू रामाचे विचार आणणे, हेच खरे रामराज्य असेल. रामाचा आदर्श हा केवळ पूजेसाठी नव्हे, तर जगण्यासाठी आहे. प्रभू रामचंद्र हे केवळ एका धर्माचे किंवा जातीचे दैवत नाहीत, तर ते 'मर्यादा पुरुषोत्तम' आहेत. जो कोणी त्याग, संयम आणि कर्तव्याचा मार्ग स्वीकारतो, तो रामाच्या आदर्शावर चालणारा नागरिक होतो. मग तो कोणत्याही धर्माचा असो, प्रभु रामाचा आदर्श हा वैश्विक आहे.



**प्रभू रामचंद्र हे केवळ एका धर्माचे दैवत नसून ते 'मर्यादा पुरुषोत्तम' आहेत. रामाचा आदर्श हा केवळ पूजेसाठी नसून तो प्रत्यक्ष जगण्यासाठी आहे. जो कोणी त्याग, संयम आणि कर्तव्याचा मार्ग स्वीकारतो, तोच खऱ्या अर्थाने रामाच्या आदर्शावर चालणारा नागरिक होतो**

**-पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी**

स्वामीजींनी एका लाकूडतोड्याची अत्यंत हृदयस्पर्शी कथा सांगितली. तो व्यक्ती गरीब होता, जळाऊ लाकडं विकून पोट भरत असे. त्याची वडिलोपार्जित जमीन त्याच्या भावाने बळकावली होती. जेव्हा त्याला विचारले गेले की, "तू तुझ्या हक्कासाठी कोर्टात का जात नाहीस?" तेव्हा त्या सामान्य लाकूडतोड्याने दिलेले उत्तर थक्क करणारे होते. तो म्हणाला, "महाराज, मी रामाच्या देशात राहतो. जर प्रभू रामचंद्रांनी भरतासाठी आपलं संपूर्ण राज्य सोडून वनवास स्वीकारला, तर मी माझ्या भावासाठी थोडी जमीन का सोडू शकत नाही? शेवटी खातोय तो माझा भाऊच आहे ना! मी रामासारखा राहीन, पण कोर्ट-कचेरी करून भावाशी संघर्ष करणार नाही." स्वामीजींनी या उदाहरणाद्वारे स्पष्ट केले की, रामाचा त्याग आजही सामान्य माणसाच्या रक्तात भिनलेला आहे.

स्वामीजींनी 'रामराज्य' आणि 'मर्यादा' या शब्दांची व्याख्या करताना सांगितले की, रामराज्यात अगदी गल्लीतील सामान्य माणसाच्या मतालाही किंमत होती.

प्रजेच्या समाधानासाठी रामाने स्वतःच्या वैयक्तिक सुखाचा त्याग केला. हा राजधर्माचा सर्वोच्च मापदंड होता. रामाने प्रत्येक नात्यात एक आदर्श घालून दिला. मित्राशी कसे वागावे, पुत्राचे कर्तव्य काय, भावावर किती प्रेम असावे आणि शत्रूशीही किती सभ्यतेने वागावे, हे रामाने आपल्या कृतीतून सिद्ध केले. म्हणूनच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हटले जाते.

स्वामीजींनी महर्षी विश्वामित्र आणि श्रीराम जेव्हा जनक राजाच्या दरबारात गेले, तो प्रसंग रंगवून सांगितला. शिवधनुष्य ज्या पेटीत होते, तिला आठ चाके होती आणि पाच हजार लोक ती पेटी ढकलत होते. १० हजार वर्षांपूर्वीचे हे प्रगत लोखंडी पेटीचे आणि चाकांचे तंत्रज्ञान पाहून आजही आश्चर्य वाटते. इतके जड आणि शक्तिशाली धनुष्य श्रीरामांनी लिलया पेलले आणि मोडले. इतका प्रचंड पराक्रम गाजवूनही रामाच्या चेहऱ्यावर गर्व नव्हता, तर महर्षी विश्वामित्रांप्रती कमालीची नम्रता होती.

स्वामीजींनी सांगितले की, ज्या धनुष्याला प्रभू श्रीरामांनी प्रत्यंचा चढवली, ते साक्षात ब्रह्मदेवाने घडवलेले दिव्य अस्त्र होते. भगवान शंकरांनी याच धनुष्याने दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस केला होता. पुढे देवांच्या विनंतीवरून महादेवांनी हे सामर्थ्यवान धनुष्य त्यागले. कोणाकडे हे सुरक्षित राहील? याचा विचार करून सर्व देवतांनी हे धनुष्य मिथिला नरेश राजा देवरात (जनक महाराजांचे पूर्वज) यांच्या स्वाधीन केले. पिढ्यानपिढ्या जनक घराण्याने या अवाढव्य आणि वजनदार धनुष्याचे जतन एका प्रचंड लोखंडी पेटीत केले होते.

सीता मातेच्या जन्माविषयी माहिती देताना स्वामीजी म्हणाले, "सीता ही 'अयोनिजा' होती, म्हणजेच तिचा जन्म मानवी योनीतून झाला नव्हता. एकदा राजा जनक शेतात नांगरत असताना नांगराचा फाळ एका पेटीला लागला. त्या पेटीत एक तेजस्वी कन्या प्रकट झाली. संस्कृतमध्ये नांगराच्या फाळाला 'सीता' म्हणतात, म्हणून या कन्येचे नाव 'सीता' ठेवण्यात आले. जनक महाराजांनी तिला पोटच्या मुलीप्रमाणे लहानाचे मोठे केले.

सीता मोठी झाल्यावर तिच्या विवाहासाठी जनक महाराजांनी एक कठीण पण ठेवला. जो कोणी शिवधनुष्य उचलून त्याला प्रत्यंचा लावेल, त्यालाच सीता मातेचा पती होण्याचा मान मिळेल. यामुळेच सीतेला 'वीर्यशुल्का' असेही संबोधले जाते. 'वीर्य' म्हणजे सामर्थ्य आणि 'शुल्क' म्हणजे किंमत; ज्याचा पराक्रम अजोड असेल, तोच सीतेचे पाणिग्रहण करण्यास पात्र ठरेल, असा हा महान संकल्प होता.

स्वयंवराच्या प्रसंगी रावणासह अनेक बलाढ्य राजे आले होते. स्वामीजींनी रावणाच्या पराभवाचे वर्णन करताना सांगितले की, अहंकाराने मदोन्मत्त झालेल्या रावणाने जेव्हा शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याचे हात थरथर कापू लागले. त्याला दरदरून घाम सुटला आणि शेवटी ते प्रचंड धनुष्य त्याच्या अंगावरच पडले. भर सभेत रावणाचा मानभंग झाला. अपमानित होऊन जाताना त्याने प्रतिज्ञा केली की, तो या अपमानाचा बदला नक्कीच घेईल.

जेव्हा रावणासह शेकडो राजांना ते धनुष्य पेटीतून बाहेरही काढता आले नाही, तेव्हा पराभूत मानसिकतेतून सर्व राजे एकत्र आले. त्यांनी जनक महाराजांच्या मिथिला नगरीला वेढा घातला आणि मुलगी स्वाधीन करण्याची किंवा युद्धाची धमकी दिली. एका बाजूला शेकडो मत्सरी राजे आणि दुसऱ्या बाजूला एकटे जनक महाराज, अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. याच परिस्थितीत महर्षी विश्वामित्र प्रभू रामचंद्र आणि लक्ष्मणाला घेऊन मिथिला नगरीत पोहोचले आणि इतिहासाला एक नवे वळण मिळाले.

पराक्रम केवळ शरीराचा नसतो, तर तो संयम आणि ईश्वरी श्रद्धेचा असतो. रावणाकडे शरीरबळ होते, पण त्याच्याकडे नम्रता आणि भक्ती नव्हती, म्हणून तो धनुष्य पेलू शकला नाही. रामाने मात्र विश्वामित्रांच्या आज्ञेने आणि विनयाने ते धनुष्य पेलले. हाच जीवनाचा धडा आहे की, संपत्ती आणि शक्तिपेक्षा विनम्रता श्रेष्ठ आहे. जेव्हा अफाट सामर्थ्याला अढळ विनम्रतेची जोड मिळते, तेव्हाच अशक्य वाटणाऱ्या गोष्टी साध्य होतात. प्रभू श्रीरामांनी शिवधनुष्य उचलण्यापूर्वी त्याला केलेले वंदन हेच त्यांच्या विजयाचे खरे गमक होते.

स्वामीजींनी रामायणातील अत्यंत रोमहर्षक अशा 'धनुष्यभंग' प्रसंगाचे सविस्तर निरूपण केले स्वामीजींनी आपल्या रसाळ वाणीतून या ऐतिहासिक घटनेचे वर्णन करताना सांगितले की, जनक राजाने आपली कन्या सीतेसाठी शिवधनुष्याला प्रत्यंचा चढवण्याची कठीण अट ठेवली होती. हे धनुष्य इतके जड होते की, हजारो लोक मिळून एका मोठ्या गाड्यावरून ते ओढत सभामंडपात घेऊन आले होते. जगातील अनेक बलाढ्य वीर आले, पण कोणालाही ते धनुष्य साधे हलवताही आले नाही. अशा कठीण समयी महर्षी विश्वामित्रांच्या आज्ञेने श्रीरामचंद्रांनी त्या धनुष्याजवळ जाऊन प्रथम त्याला अत्यंत नम्रपणे वंदन केले.

स्वामीजी पुढे म्हणाले की, सर्वांना जड वाटणारे ते महाधनुष्य श्रीरामांनी एखाद्या खेळातील वस्तूप्रमाणे 'अनायासे' पेटीतून बाहेर काढले. त्यांनी एका हाताने धनुष्य पेलले आणि दुसऱ्या हाताने त्याची प्रत्यंचा थेट कानापर्यंत खेचली. श्रीरामांनी लावलेला जोर इतका प्रचंड होता की, ते शिवधनुष्य कडाडून मध्यभागी तुटले. या घटनेचा आवाज इतका भयानक होता की, जणू काही मोठा भूकंपाचा भास झाला आणि सभेत उपस्थित असलेले अनेक लोक त्या आवाजाने मूर्च्छित झाले. धनुष्य तुटल्याचे पाहून जनक महाराजांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांनी तात्काळ आपले दूत अयोध्येला पाठवून राजा दशरथांना हे शुभ वर्तमान कळवले आणि त्यांना सप्रेम निमंत्रण दिले. स्वामीजींनी यावेळी राजा दशरथांच्या शिस्तीचेही कौतुक केले. दशरथ महाराजांनी इतकी मोठी आनंदाची बातमी ऐकूनही स्वतःहून कोणताही निर्णय घेतला नाही; त्यांनी आपले कुलगुरू महर्षी वसिष्ठ यांची संमती घेतल्यावरच मिथिलेकडे प्रस्थान केले. हा प्रसंग ज्येष्ठ आणि गुरुजनांचा आदर कसा करावा, याचा वस्तुपाठच आहे. याच काळात कैकयीचा पुत्र भरत याचे मामा देखील अयोध्येत पोहोचले होते. भरताला नेण्यासाठी ते आले होते, परंतु सर्व वऱ्हाडी मंडळी मिथिलेला गेल्याचे समजताच ते देखील तिथे रवाना झाले. मिथिलेत पोहोचल्यावर जनक महाराजांनी दशरथ राजांचे आणि ऋषीमुनींचे शाही स्वागत केले. केवळ श्रीराम आणि सीता यांचाच नव्हे, तर जनक महाराजांनी आपली दुसरी मुलगी उर्मिला हिचा विवाह लक्ष्मणाशी करण्याचा प्रस्तावही यावेळी मांडला.

स्वामीजींनी या प्रवचनातून भाविकांना मोलाचा संदेश दिला की, जीवनात कितीही मोठे यश मिळवायचे असेल तर श्रीरामांसारखी विनम्रता आणि दशरथ महाराजांसारखी गुरुभक्ती अंगी बाणवणे आवश्यक आहे. कठीण प्रसंगातही श्रद्धेच्या जोरावर अशक्य गोष्टी शक्य होतात, हेच या धनुष्यभंग प्रसंगातून आपल्याला शिकायला मिळते.

भारतीय संस्कृतीत विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा मेळ नसून, तो दोन कुळांचा आणि दोन महान संस्कृतींचा पवित्र संगम आहे. प्रभू रामचंद्र आणि माता सीता यांचा विवाह सोहळा आपल्याला कुळपरंपरेचे महत्त्व आणि गुरुंच्या आज्ञेचे पालन कसे करावे, याचा आदर्श वस्तुपाठ घालून देतो.

स्वामीजींनी आपल्या प्रवचनात दशरथ महाराजांच्या अढळ गुरुभक्तीचा उल्लेख केला. विवाहाचा प्रस्ताव आल्यावर दशरथ महाराजांनी अत्यंत नम्रतेने स्पष्ट केले की, जरी ते मुलाचे पिता असले, तरी अयोध्या राजघराण्याचे सर्व निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार केवळ कुलगुरू महर्षी वसिष्ठांना आहे. "आमच्या घराण्यात गुरुंची आज्ञा हीच प्रमाण आहे," हा दशरथ महाराजांचा विचार आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे स्वामीजींनी नमूद केले. या विवाह प्रसंगातील 'कुलपुराण' म्हणजेच वंशावळीच्या महत्त्वाबद्दल सांगताना स्वामीजी म्हणाले की, जेव्हा विवाह निश्चित होतो, तेव्हा कुलगुरू वसिष्ठ ऋषींनी अयोध्येच्या राजघराण्याचा गौरवशाली इतिहास कथन केला. विवाहामध्ये दोन्ही पक्षांच्या कुळाची आणि संस्कारांची माहिती असणे किती आवश्यक आहे, हे यातून स्पष्ट होते. अयोध्येप्रमाणेच मिथिलेचे राजपुरोहित आणि माता अहिल्येचे पुत्र शतानंद ऋषी यांनीही जनक घराण्याची परंपरा मांडली. आजही ग्रामीण आणि आदिवासी भागात लग्नप्रसंगी कुळपुराण वाचण्याची ही प्राचीन प्रथा जिवंत असल्याचे स्वामीजींनी सांगितले.

विवाहापूर्वीच्या दानधर्माचे वर्णन करताना स्वामीजींनी सांगितले की, दशरथ महाराजांनी प्रत्येक पुत्रासाठी एक लाख याप्रमाणे एकूण ४ लाख गाईंचे 'गोदान' केले. या गाई वासरासहित, सुवर्णमढवलेली शिंगे असलेल्या आणि कास्यपात्रासह होत्या. यासोबतच सुवर्ण, धन आणि धान्याचे मोठ्या प्रमाणावर गरिबांना दान करण्यात आले. दान हे केवळ कर्तव्य नसून तो एक कृतज्ञतेचा भाव असल्याचे स्वामीजींनी स्पष्ट केले. विवाहाच्या मुख्य विधींपूर्वी पार पडलेल्या मंगल कार्यांचेही स्वामीजींनी रसाळ वर्णन केले. यामध्ये उभय पक्षांनी केलेले यज्ञकार्य, हळदी समारंभ, चुडा भरणे आणि मेहंदीचा उत्साहपूर्ण सोहळा पार पडला. शेवटी एकमेकांना अक्षता देऊन लग्नाचे निमंत्रण पूर्ण झाले. या सर्व विधींमागे एक शास्त्रीय आणि आध्यात्मिक अधिष्ठान होते.

स्वामीजींनी या प्रवचनातून समाजाला मोलाचा संदेश दिला की, ज्या संसारात कुळपरंपरेचा सन्मान आणि थोरामोठ्यांच्या आज्ञेचे पालन केले जाते, तोच संसार आनंदी आणि अर्थपूर्ण होतो. रामायणातील हे संस्कार अंगी बाणवणे हीच खऱ्या अर्थाने रामराज्याची सुरुवात आहे, असे आवाहन स्वामीजींनी उपस्थितांना केले.

रामाचा आदर्श हाच भारतीय संस्कृतीचा प्राण आणि लोककल्याणाचा मार्ग आहे. काळाच्या पडद्याआड दहा हजार वर्षे उलटून गेली तरी, राम आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात, घरात आणि गावात जिवंत आहेत. त्यांचे जीवनचरित्र हे केवळ वाचण्यासाठी नसून ते आचरणाची सीमा ठरवण्यासाठी आहे. स्वामीजींनी प्रभू रामांच्या विवाह सोहळ्यातील बारकावे आणि रामराज्याच्या संकल्पनेवर प्रकाश टाकला. स्वामीजींनी आपल्या निरूपणात रामायणातील विवाहाच्या विधींचे महत्त्व विशद केले. सप्तपदी आणि प्रतिज्ञाविधी पूर्ण झाल्यानंतर जेव्हा जानकीसह चारही कन्या अयोध्येला प्रस्थान करू लागल्या, तेव्हा जनक महाराजांनी त्यांना दिलेल्या 'अंदण' प्रथेचा स्वामीजींनी विशेष उल्लेख केला. जनक महाराजांनी हजारो गाई, विपुल धान्य आणि खाद्यवस्तू कन्यांसोबत दिल्या होत्या. या दानामागील सामाजिक उद्देश स्पष्ट करताना. स्वामीजी म्हणाले की, हे दान सासरच्या घरी काही कमी आहे म्हणून दिलेले नसे, तर नवीन सून घरात आल्याचा आनंद संपूर्ण गावापर्यंत पोहोचवण्यासाठी दिलेले असे. या वस्तू गावातील प्रत्येक घरापर्यंत वाटल्या जात, जेणेकरून 'घरात लक्ष्मी आली आहे' हा संदेश जनमानसात पोहोचावा. कन्यांच्या सुखासाठी मिथिलेतून खास सेवेकरीही धाडले होते, ज्यामुळे नवीन वातावरणात त्यांना माहेरची उणीव भासणार नाही, याची काळजी घेतली गेली.

अयोध्या नगरीत जेव्हा या नवलक्ष्मींचे आगमन झाले, तेव्हा झालेल्या अभूतपूर्व स्वागताचे वर्णन करताना स्वामीजींनी 'रामराज्या'चे सूत्र मांडले. रामराज्यात वैयक्तिक सुखापेक्षा राजधर्माला आणि कुलगुरूंच्या मार्गदर्शनाला सर्वोच्च स्थान होते. कुलगुरूंच्या सल्ल्याशिवाय कोणताही महत्त्वाचा निर्णय घेतला जात नसे. प्रभू श्रीरामांनी स्वतःला या शिस्तीत बांधून घेतले होते, म्हणूनच त्यांचे राज्य आजही आदर्श मानले जाते.

रामनवमी उत्सवाच्या औचित्याबद्दल बोलताना स्वामीजींनी संस्कारांच्या शिदोरीवर भर दिला. ते म्हणाले की, रामनवमीच्या नऊ दिवसांच्या काळात वाल्मिकी, कंब किंवा अध्यात्म रामायणाचे जे पारायण चालते, त्याचा मुख्य उद्देश हाच आहे की नवीन पिढीवर रामाच्या जीवनचरित्राचे संस्कार व्हावेत. रामाचे चरित्र ऐकल्याने माणसाला आपल्या आयुष्याची आणि आचरणाची मर्यादा आखून घेता येते. प्रतिकूल परिस्थितीतही डगमगून न जाता धर्माच्या मार्गावर कसे चालावे, हे श्रीराम शिकवतात.

स्वामीजींनी या प्रवचनातून समाजाला असा संदेश दिला. की, रामराज्य हे केवळ इतिहासातले पान नसून ती एक जिवंत प्रेरणा आहे. पितृवचनासाठी राजवैभवाचा त्याग करणारे राम हे 'आदर्श पुत्र' आहेत. सीतामाईंप्रति असलेली त्यांची निष्ठा 'एकवचनी, एकपत्नी' व्रताचा वस्तुपाठ देते. तर लक्ष्मण-भरतावरील प्रेम आणि सुग्रीव-बिभीषणाशी असलेली मैत्री ही त्याग आणि विश्वासाची शिकवण देते. प्रजेच्या हितासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करणारा राजा कसा असावा, हे श्रीरामांनी जगाला दाखवून दिले. आजही 'सुशासना'साठी रामराज्याचेच उदाहरण दिले जाते. संकटाच्या काळातही स्थिर राहून संयमाने निर्णय घेण्याची वृत्ती आजच्या धावपळीच्या युगात मानवाला अत्यंत आवश्यक आहे. प्रभु श्रीरामांचे हे सर्व आदर्श आपल्या सर्वांच्या आचरणात येवोत, अशी प्रार्थना स्वामीजींनी सद्गुरू चरणी केली. जर आपण रामाचे आदर्श आपल्या आयुष्यात उतरवले, तरच रामनवमी साजरी करणे सार्थ ठरेल. स्वामीजींच्या अमृततुल्य विचाराने श्रोत्यांना जीवनाचा एक नवा दृष्टिकोन दिला.

**या सत्संग सोहळ्याला मीरा-भाईंदर ते विरार विभागातील हजारो गुरुभक्त उपस्थित होते. गुरुभक्त मंडळाच्या अथक परिश्रमामुळे नालासोपाऱ्यातील 'रामनवमी' सत्संग सोहळा यशस्वी झाला. वसई विरार महानगरपालिका माजी नगरसेवक श्री. चंद्रकांत गोरिवले यांनी उपस्थित राहून प्रतिवर्षी प्रमाणे यावेळी सुद्धा महाप्रसादाची व्यवस्था केली होती. त्यांचाही विशेष सन्मान पू. स्वामीजींच्या हस्ते करण्यात आला.**

*** श्री. जयराम पवार**
*** श्री. विष्णू शिंदे**
*** श्री. एकनाथ गवस**
*** श्री. आत्माराम जाधव**
*** श्री. रवींद्र कदम**
*** श्री. महादेव कुंभेकर**

**या गुरुसेवकांनी प्रतिवार्षिक सत्संग कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाची सांगता आरती आणि त्यानंतर महाप्रसादाने झाली. वसई-विरार विभागातील हजारो गुरुभक्तांनी या सोहळ्याचा लाभ घेतला.**

मराठी अक्रॉस मुंबई

# भगवान शिव को प्रिय है रुद्राक्ष



**सनातन धर्म में रुद्राक्ष का अधिक महत्व है। भगवान शिव को रुद्राक्ष प्रिय है। धार्मिक मान्यता है कि रुद्राक्ष धारण करने से जातक पर देवों के देव महादेव की कृपा सदैव बनी रहती है। रुद्राक्ष की उत्पत्ति को लेकर कई पौराणिक कथाएं मौजूद हैं। आइए जानते हैं कि किस तरह हुई रुद्राक्ष की उत्पत्ति?**



## इस दिन धारण कर सकते हैं रुद्राक्ष

रुद्राक्ष को धारण करने के लिए नियमों का पालन करना चाहिए। अगर आप रुद्राक्ष की माला पहनना चाहते हैं, तो इसके लिए शुभ दिन श्रावण सोमवार, शिवरात्रि, अमावस्या और पूर्णिमा है। रुद्राक्ष धारण करने से पूर्व इसे सरसों के तेल और दूध से साफ कर लें। इसके बाद 'ओम नम: शिवाय मंत्र' जाप के साथ रुद्राक्ष धारण करना चाहिए।

## रुद्राक्ष की उत्पत्ति

प्राचीन कथा के अनुसार, एक त्रिपुरासुर नामक दैत्य था। उसे अपनी शक्ति का अधिक घमंड था। इसलिए उसने पृथ्वी के साथ देव लोक में भी हाहाकार मचा दिया था। उसे कोई भी देवी-देवता और अस्त्र परास्त नहीं कर पा रहे थे, जिस कारण देवी-देवता भगवान शिव के पास अपनी प्रार्थना लेकर पहुंचे। जब देवी-देवता कैलाश पर्वत पर पहुंचे, तो उस दौरान भगवान महादेव योग मुद्रा में अपने नेत्रों को बंद कर तप कर रहे थे, जब प्रभु ने नेत्र खोला तब उनकी आंखों से कुछ अश्रु छलक कर धरती पर गिर गए। शिव के इन आंसू से रुद्राक्ष के पेड़ का जन्म हुआ। मान्यता है कि जिस जगह पर महादेव के आंसू गिरे, वहां पर रुद्राक्ष के पेड़ उग आए। इसलिए रुद्राक्ष को भगवान शिव के तीसरे नेत्र का स्वरूप मानकर पूजा-अर्चना की जाती है। इसी तरह रुद्राक्ष की उत्पत्ति हुई।



# मंदिर में भूलकर भी न रखें ऐसी मूर्तियां

**वैसे तो हर घर के मंदिर में अलग-अलग देवी-देवताओं की मूर्ति रखी जाती है, लेकिन वास्तु शास्त्र में माना गया है कि कुछ देवी-देवताओं की मूर्ति या फिर तस्वीर को अपने घर के मंदिर में नहीं रखना चाहिए, अन्यथा इसके नकारात्मक परिणाम भी मिल सकते हैं। ऐसे में जानते हैं कि किन देवी-देवताओं की मूर्ति या तस्वीर को घर के मंदिर में रखना अशुभ माना गया है।**

### इसलिए न रखें शनि देव की मूर्ति

शनि देव को हिंदू धर्म में न्याय का देवता माना जाता है। वहीं कई लोग शनि देव की पूजा-अर्चना भी करते हैं, लेकिन उनकी तस्वीर या फिर मूर्ति को घर के मंदिर में रखने की मनाही होती है, क्योंकि वह एक उग्र देव माने गए हैं। इसलिए शनि देव की पूजा घर की बजाय मंदिर में जातक ही करना अधिक शुभ माना गया है।

### मिल सकते हैं अशुभ परिणाम

शनिदेव की भांति ही मां काली की मूर्ति और तस्वीर को भी घर के मंदिर में रखना अच्छा नहीं माना जाता, क्योंकि वह भी उग्र देव-देवताओं में शामिल हैं। इसलिए इनकी पूजा घर में नहीं करनी चाहिए। इसके साथ ही मां काली की पूजा के नियम भी काफी कठिन होते हैं और इसे घर में करना उचित नहीं समझा जाता।

### नटराज की मूर्ति

अधिकतर लोग घर में नटराज की मूर्ति रखना पसंद करते हैं, लेकिन नटराज वास्तव में भगवान शिव का रौद्र रूप माने जाते हैं। ऐसे में नटराज की मूर्ति को घर के मंदिर में रखने से बचना चाहिए, वरना घर में कलह व अशांति का माहौल बना रहता है।

### इन बातों का भी रखें ध्यान

**देवी-देवताओं की मूर्ति अलग-अलग मुद्राओं में भी मिलती है, लेकिन इस बात का ध्यान रखें कि भगवान गणेश और मां लक्ष्मी की हमेशा बैठी हुई मूर्ति ही घर में लानी चाहिए। खड़ी हुई या अन्य किसी मुद्रा में देवी-देवताओं की मूर्ति के मंदिर में रखना शुभ नहीं माना जाता।**

# जमीन पर बैठने के फायदे

**फर्श पर जिस तरह लोग बैठते हैं, वह एक तरह का आसन होता है। इससे शरीर को कई फायदे होते हैं। ऐसा करना कूल्हों, पैरों, पेट ही नहीं ओवरऑल हेल्थ के लिए लाभकारी होता है। फर्श पर जिस तरह लोग बैठते हैं, वह एक तरह का आसन होता है। इससे शरीर को कई फायदे होते हैं। ऐसा करना कूल्हों, पैरों, पेट ही नहीं ओवरऑल हेल्थ के लिए लाभकारी होता है। जमीन पर बैठकर खाने से पाचन भी दुरुस्त रहता है।**

- फर्श पर बैठना कुर्सी-सोफा या बेड पर बैठने से ज्यादा फायदेमंद होता है। फर्श यानी जमीन पर बैठना हमारी संस्कृति का अहम हिस्सा रहा है। हमारे यहां जमीन पर बैठकर खाने की पुरानी परंपरा रही है। आज भी गांवों में ज्यादातर लोग जमीन पर ही बैठकर खाना पसंद करते हैं। ऐसा करने से शरीर को कई फायदे मिलते हैं। फर्श पर बैठने से सेहत को जबरदस्त बेनिफिट्स मिल सकते हैं। इससे पाचन सुधरता है, बॉडी की फ्लैक्सिबिलिटी बनी रहती है
- जमीन पर पद्मासन यानी पलथी लगाकर बैठना मेडिटेशन के लिए फायदेमंद होता है। इस आसन से तनाव कम होता है और शरीर में ऑक्सीजन सप्लाई बढ़ता है। इस स्थिति में बैठने से रीढ सीधी होती है और कंधे की मांसपेशियों को आराम मिलता है।
- जमीन पर बैठने से शरीर की बहुत सी मांसपेशियों में खिंचाव आता है, जिससे फ्लैक्सिबिलिटी यानी लचक बढ़ती है। जिससे शरीर कई समस्याओं से बच सकता है और हमेशा एक्टिव बना रहता है। इससे ऊर्जा का सही संचार होता है।
- बिजी लाइफस्टाइल के बीच ज्यादातर लोग आज किसी न किसी दर्द से गुजरते हैं। इस दर्द को कम करने के लिए आप फर्श पर बैठ सकते हैं। ऐसा करने से पीठ के निचले हिस्से, कमर और पेट की मांसपेशियां मजबूत बनती है और पैरों, घुटनों और कूल्हों की ताकत भी बढ़ती है, जिससे दर्द कम हो सकता है।
- क्रॉस लेग पोजीशन में बैठने से शरीर में ब्लड सर्कुलेशन बढ़िया होता है। यह नसों को शांत करने का काम करता है, इससे तनाव दूर हो सकता है। जमीन पर बैठने से हार्ट की हेल्थ भी बेहतर बनी रहती है। इससे दिल पर कम दबाव पड़ता है। सुखासन में बैठने से ब्लड सर्कुलेशन सही बना रहता है।
- कुर्सी या सोफे पर बैठने पर पूरा दबाव हिप्स पर आ जाता है। इससे शरीर का सारा बोझ उठने में दिक्कत होती है, लेकिन अगर आप जमीन पर बैठते हैं तो सारा भार हिप के अलावा जांघों में बंट जाता है, जिससे काफी राहत मिलती है, जोड़ों को आराम मिलता है।



# प्याज को कैसे किया जाए स्टोर

***प्याज को कैसे स्टोर किया जाए और उसे सड़ने से कैसे बचाया जाए, तो यहां कुछ सरल उपाय और तरकीबें दी गई हैं जिनकी मदद से आप इन्हें लंबे समय तक ताजा स्टोर कर सकते हैं। प्याज को सड़ने से बचाने के लिए सही भंडारण और रख-रखाव जरूरी है। आइये जानते हैं ऐसे ही कुछ टिप्स और ट्रिक्स के बारे में, जो आपके किचन के काम को और आसान बना सकते हैं।***

- प्याज खरीदते समय, ऐसे प्याज को चुनें जो सख्त और सूखा हो। इतना ही नहीं इस पर को खरोंच के निशान या मुलायम नहीं होने चाहिए। हमेशा चोटिले या दबे कुचले प्याज खरीदने से बचें, क्योंकि उनके जल्दी सड़ने की संभावना अधिक होती है।
- प्याज को हमेशा नमी वाली जगह से दूर रखें। कुछ लोग इसे फ्रिज में स्टोर करते हैं, आप ऐसी गलती बिल्कुल न करें। प्याज को ठंडे और सूखे वातावरण में ही रखें, जिससे इसके सड़ने की संभावना कम हो सकती है।
- अपनी पेंट्री या रसोई में एक ऐसा स्थान ढूंढें जहां अच्छा वेंटिलेशन हो और हवादार जगह पर इन्हें स्टोर करें। हालांकि, यह गर्मी और सीधी धूप से दूर होने चाहिए।



# गर्मियों के मौसम में खाएं फल

